# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००५ |
| वर्ष | : | सहावे |
| अंक | : | ४ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |


**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**"ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ९१**

MAHMAR/ 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
ठाणे



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष सहावे / अंक ९ / मार्च २००५

## संपादकीय

### टिल्लूसर गेले !

'स्मृतिपत्रे' या डायऱ्यांमध्ये असणाऱ्या लिखाणाचे संपादन हे टिल्लूसरांच्या परिचयाचे पहिले निमित्त ठरले. या निमित्तांतून निमित्ते घडत गेली आणि सरांचा व माझा स्नेह वाढत गेला. विद्या प्रसारक मंडळाबद्दलचा त्यांचं प्रेम, शिक्षणावर असणारी निष्ठा, वाचन, लेखनाची ओढ या सर्व आमच्यातल्या समान बाबी ठरल्या, आणि सरांचा सहवास मिळत गेला.

आयुष्यातील जेष्ठ स्नेही गेल्यावर मनात जाणवणारा पोरकेपणा, गमावलेपणाची जाणीव यामुळे काय लिहायचं हेच सुचत नाही. महाराष्ट्रात शैक्षणिक संस्था खूप आहेत. पण त्यांच्या जडणघडणींचा लिखीत इतिहास अभावानेच असावा. म्हणून आपल्या संस्थेचा इतिहास लिहून काढायला हवा, पुढच्या पिढ्यांसाठी तो महत्त्वाचा दस्तऐवज असेल असा विचार मी त्यांच्याशी बोलताना व्यक्त केला. कृतिशील स्वभावाच्या टिल्लूसरांनी या दृष्टीने लगेचच कामाला सुरुवात केली. सन्मित्रच्या जुन्या फायली चाळायच्या, जुन्या लोकांना भेटायचे, जुन्या लोकांशी चर्चा करायच्या व उपलब्ध कागदपत्रांचा अभ्यास करायचा असे करत करत 'तयाचा वेलू गेला गगनावरी' हा ग्रंथ तयार झाला. कवितांवर केलेल्या कविता असे त्यांच्या वडिलांच्या संग्रहातील हस्तलिखित सापडले. मग त्याचे पुस्तक करायचे हा विचार . त्या काळात मराठीतल्या कित्येक कवींचे वाचन त्यांनी केले. आमच्या चर्चा होत. एखादा विचार नवीन मिळाला की पुन्हा वाचन... आणि त्यातून 'झपूर्झा' ची निर्मिती झाली. आपल्या महाविद्यालयांची वार्षिकं निघतात पण त्यांची दखल घेतली जात नाही असे जाणल्यावर स्वत: टोपणनावाने प्रत्येक वार्षिकावर सन्मित्रमध्ये लेख लिहिले.. कितीतरी आठवणी आहेत. 'दिशा' च्या निमित्ताने केलेले विचार, झालेल्या भेटी, भावे व्याख्यानमालेसाठी झालेल्या भेटी... कितीतरी. ग्रंथालयात आले की एखादा नवीन विषय द्या किंवा तुम्हाला भावलेलं एखादं पुस्तक द्या असं हमखास म्हणायचे....

शेवटी उरतात त्या आठवणी हेच खरं. होणाऱ्या भेटी, समान सुरांमुळे रंगणाऱ्या भेटी हे सर्व योग असतात. तुमच्या सारखे झपाटलेले वाचक भेटणे हा ग्रंथालयांचा बहुमान असतो, तुमच्याच शब्दात 'ईश्वराने देणे' असते. तुमची धडपड संपली. पण तुमच्या भेटी मनाच्या कप्प्यात अशाच राहतील.

**'दिशा'तर्फे तुम्हाला विनम्र श्रद्धांजली!**




वर्ष सहावे / अंक ४ / मार्च २००५

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १ ले / अंक १ ला)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | शतकत्रय कर्ता भर्तृहरी (लेखांक २रा) | शं. बा. मठ | ३ |
| २) | 'माहिती तंत्रज्ञानातून व्यवसायक्षमतांचा विकास' | प्राचार्य दि. कृ. नायक | ८ |
| ३) | गीता विज्ञाननिष्ठ निरुपण | आशा भिडे | १३ |
| ४) | 'तोवरि नूतन, नीतरामायण' | अभेय प्र. रानडे | १९ |
| ५) | दिशा संशोधनाच्या... | डॉ. मंगल बोरकर | २१ |
| ६) | निंदकाचे घर... | कु. रविंद्र शि. तोडकर | २४ |
| ७) | शिर्डी देवस्थान अेक अनुभव- वेगळ्या दृष्टिकोनातून | सुरेंद्र लागू | २६ |
| ८) | आत्म विश्वास | प्रसन्न गो. कुलकर्णी | ३० |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३१ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# शतकत्रय कर्ता भर्तृहरी

*शतकत्रय कर्ता भर्तृहरी वरील लेखमालेतील हा पुढील लेख - संपादक*

(लेखांक दुसरा)

**काव्य रचना -**

भर्तृहरीने शृंगार शतक प्रथम रचले असावे. त्यानंतर जीवनाला मार्गदर्शक नीतिशतकाची रचना केली असावी. पुढील काळात योग साधना इत्यादींमुळे संन्यास ग्रहणानंतर वैराग्य शतक रचिले असावे. त्याचे शृंगार शतकही वैराग्य शतकाला पूरक असेच आहे. त्याचे व्यक्तिमत्त्व बहु आयामी असावे. तो शैव वेदान्ती आहे. अहिंसा, स्वदार संतोष, सत्य, अपरिग्रह, तृष्णाशमन इत्यादी कल्पना कवीने सांगितलेल्या आहेत. तो दैववादी असूनही प्रयत्नांची कास सोडू नये असे म्हणतो. निष्क्रियतेचा त्याने धि:कार केला आहे. धैर्य, मान, पराक्रम, दान, शौर्य, परोपकार इत्यादी सद्गुणांची बूज राखण्यास त्याने आवर्जून सांगितले आहे.

भर्तृहरीने आपल्या तीनही शतकात सनातन धर्म व तत्त्वज्ञान यांना अनुसरून मानवी आचरणाचा यथायोग्य मार्ग दाखविला आहे. परतत्व स्पर्श हे जीवनध्येय मानले गेले आहे. या गोष्टींची ओळख विहित कर्माचरणाने, ज्ञानाने व परमेश्वर भक्तीने आणि योग साधनेने अद्वैताची जाणीव होऊन, अनित्यसुखाकडे पाठ फिरविण्याने मानवाला नित्य शाश्वततेचा साक्षात्कार होऊन तो मुक्त होतो. कर्मनाशाने अतीन्द्रिय आनंद प्राप्त होतो. गंगा, वाराणसी, हिमालय या पवित्र स्थळांचा कवी आवर्जून उल्लेख करतो. अवतार कल्पनेवर त्याची श्रद्धा आढळते. पुराणादी वाङ्मय त्याला सुपरिचित असावे. शतकत्रयात भर्तृहरीचे व्यक्तिमत्त्व यथार्थतेने उमटलेले आहे; ते एकसंध व एकात्म असे आहे. त्यात अनुभवाचा जिव्हाळा आहे, ओलावा आहे, शुष्क मत प्रदर्शन नाही. त्याची मते ठाशीव, तावून सुलाखून निघालेली आणि अनुभवजन्य असल्याने प्रत्ययकारी वाटतात. त्यानुरूप असलेल्या शैलीमुळे ती प्रभावी वाटतात.

**शृंगार शतक -**

शृंगार शतकात प्रणय चित्रण बहारीचे आहे. मात्र हे शतक प्रणय विषयक सूक्ती संकलन नसून प्रणयाचे वैफल्य सिद्ध करून पाहणारा तो एक आर्तरव आहे. त्यात प्रणयी जीवनाची चाखलेली खुमारी घोळविणारा स्वप्नाळू मानव नसून प्रणयातून निष्पन्न होणारी कटु दु:खे तळमळीने साकार करणारा एक अनुभवी प्रत्ययकारी यथार्थवादी मानव आहे. स्वैरता आणि संयम यात हेलकावे घेणारे मन प्रतिबिंबित झाले आहे **'सुन्दरी वा दरी वा' यौवनं वा वनं वा ।'** अशा प्रकारचे विचार विखुरलेले आढळतात.

जीवनात प्रणयातील गोडी जितकी आकर्षक तितकीच अत्यंत तिरस्कार्य आहे. तिचा तीव्रतर धि:कार कवी करतो. प्रणयविषयक उबग आल्याची ही भावना प्रकृतिजन्य नसून स्वत:ला त्या मोहापासून दूर ठेवण्याच्या आवश्यकतेमुळे आहे. आत्यंतिक प्रणयासक्तीतून कवीचे आत्यंतिक वैराग्य जन्म घेते. कलात्मक प्रकृतीचा व प्रमाथी विकारांचा हा भावनावश कवी जीवनात प्रणयानंतर लुब्ध पाहतो पण त्यात तो स्थिरावत नाही. त्याचे उद्गार तीक्ष्ण जळजळीत असे भासतात. नीती व वैराग्य या शतकात तो बराच शांत दिसतो. कारण जीवनातील व प्रणयातील सुष्ट-दुष्ट अनुभवांची त्याला जाण आली आहे. भर्तृहरी काव्यापेक्षा, विवेकाचा पाया, भावनांचा कल्लोळ,

विचारांचा कौल अधिक प्रभावी करतो.

**वैराग्य शतक -**

हीच गोष्ट वैराग्य शतकाची. येथे कवी एक संन्यस्त वृत्तीचा, कठोर, घुम्या प्रकृतीचा माणूस उभा करीत नाही तर जगातील निरर्थकतेमुळे व दुष्टपणामुळे जीवनातील शिव, सौंदर्य, मांगल्य यावरील आंतरिक निष्ठा हादरलेल्या आहेत अशा ध्येयवादाचे, तळमळीचे आणि हृदय पिळवटून टाकणारे ते उद्गार आहेत. अर्थार्जन, अर्थव्यय, याच्या जीवनचक्रात मानवाच्या वाट्याला येणाऱ्या कष्टांचा त्यात उल्लेख आहे. सेवेत स्वाभिमानाला लागणाऱ्या धक्क्याचा त्यात निर्देश आहे. ध्येयासाठी धडपडणाऱ्या मानवाच्या आशांचा कसा चक्काचूर होतो आणि त्याचा नुसता वाद कसा ठरतो ते कवीच्या उक्तीत तरळत राहते. जराजर्जर झालेल्या जीवनात साफल्य व फसवे समाधान मानणाऱ्यांना येथे अनासक्तीची शिस्त लावून घेण्याचा कवीने कळकळीने उपदेश केला आहे.

**नीतिशतक -**

नीतिशतकात त्याची नैतिक शिकवण प्रकर्षाने जाणवते. जीवनातील आवश्यक निष्ठा विशद करताना त्याने स्वाभिमानी वर्तनाला स्थान आवर्जून दिले आहे. धैर्यशील वर्तनाला जीवनात मोठे स्थान आहे असे कवी प्रतिपादतो. चिकाटी, उद्यमशीलता अंगी बाणलेले थोर लोक विघ्ने आली तरी न जुमानता अंगीकृत कार्य नेटाने पार पाडतात. तसेच परोपकार त्याच्या मते एक श्रेष्ठ मूल्य आहे. आपल्या बांधवासाठी तनमनधनाने स्व सामर्थ्यानुरूप झटणे, त्यांना सहाय्य करणे, निरपेक्षपणे परार्थ साधणे 'रंजल्या गांजल्यांना' हृदयी धरणे ही सज्जनपणाची लक्षणे होत.

येणेप्रमाणे नीतिशतकात मानवी जीवनाला उपयुक्त अशी आचारसंहिता संक्षेपाने पण परिणामकारक शैलीने ग्रथित केली आहे. ज्ञानाचा महिमा वर्णून कवी अज्ञानाला दूषण देतो. द्रव्याचे जीवनातील महत्त्वाचे स्थान विशद करतो. शौर्य आदी गुणांची प्रतिष्ठा सांगतो. स्वाभिमानाला पराकाष्ठेचे महत्व देतो. खल पुरुषाचे चित्रण करून विरोधाने सज्जनाचे गुण तो उठावदार पद्धतीने पुढे मांडतो. परोपकार, धैर्य, धाडसी स्वभाव याचे वर्णन केल्यानंतर शेवटी कर्माचे प्रभुत्व व दैवाची सत्ता याची यथायोग्य जाणीव करून देतो. अशा रीतीने मानवी जीवनाला आधारभूत अशा मूल्यांची खरी ओळख नीतिशतकाच्या द्वारा करून देण्याचे कवीचे उद्दिष्ट चांगल्याप्रकारे साध्य झाले आहे.

नीतिशतक हा केवळ सूक्तिसंग्रह नाही वा केवळ व्यावहारिक सदाचाराचा वस्तुपाठ नाही. जीवनाविषयीची गूढ आसक्ती व अनिष्ट प्रवृत्तीचा उबग हे त्यात प्रतिबिंबित झाले आहेत. राजे लोकांचा तापट स्वभाव, द्रव्याचा उन्माद, सेवाधर्मातील अपमानित जिणे, विकार व दुराग्रह यांच्याशी वैदग्ध्य व सुसंस्कृती यांचा परस्पर संघर्ष, अज्ञ व दुष्ट प्रवृत्तीनी सूज्ञ व सृष्टीची केलेली अवहेलना या साऱ्यांचा परामर्ष घेऊन कवी आपल्या हृदयातले शल्य अभिव्यक्त करतो.

सारांश, शतकत्रय कर्ता हा जीवनात वावरणारा सामान्य माणूस पण अनुभवाने पोळलेला आणि विचारांना धार आलेला एक गंभीर द्रष्टा असा कवी दिसतो. तो अर्थार्जनाला विटून गेलेला आहे. युवतीच्या स्वर्गीय सहवासाची मादक गोडी त्यांनी खूप चाखलेली असावी पण त्यांतून भोगाची वैयर्थता त्याच्या हाती लागली. व्यवहारातील भिन्नभिन्न प्रवृत्तींशी संबंध आल्याने त्याला आचरणाची शाश्वत दिशा कळलेली आहे. वास्तव तो नैतिक सदाचरणाचा अधिकार वाणीने उपदेश करू शकतो.

हे सारे त्याने मोजक्या व नेटक्या शब्दात विशद करून अर्थघनता आणलेली आहे. मर्यादित वाक् प्रयोगांनी आणि शब्द संक्षेपाने यथार्थभाव प्रकट केले आहे. काव्यात

दुर्गमता आढळत नाही. ती सुगम व अर्थवाही आढळते.

जनमानसाची चटकन पकड घेणाऱ्या त्याच्या काव्यातील गुण वैशिष्ट्ये लक्षात येतात. काही श्लोक तर सतत गुणगुणावेत असे आहेत. भावोत्कटता व सुटसुटीतपणा यामुळे त्याची लघुकाव्य निर्मिती श्रेष्ठ ठरली आहे. त्यात उपदेशाचा आव आणलेला नाही वा पोकळपणा भासत नाही. बोधपर, उपदेशपर, नीती, वाङ्मय निर्माण करणाऱ्या कवीस भर्तृहरीस प्रथम स्थान आहे. त्याचे अवलोकन सूक्ष्म असून त्याच्या काव्याची हृद्यता त्याच्या योजकतेवर व औचित्यावर आहे. प्रसाद, लालित्यही विपुल आहे.

**नीतिशतकातील काही श्लोकांचा आस्वाद -**

आपण वृद्धांना आदरणीय व श्रेष्ठ मानतो हे सामान्यत: खरे आहे. पण काही वेळा वाढते वय हेच सुजाणतेचे प्रमाण असू शकत नाही. काहींचे मोठेपण वयावर अवलंबून नसते. हे जीवनातील मार्मिक निरीक्षण कवीने व्यक्त केले आहे.

*सिंह: शिशुरपि निपततिमदमलिन कपोलभित्तिषु गजेषु ।*
*प्रकृतिरियं सत्ववतां न खलु वय: तेजसो हेतु: । (नी.श.)*

सिंहाचा छावा वयाने लहान असतो. मोठमोठे मदाने माजलेले हत्ती असतात पण तो छावा त्यांच्यावर तुटून पडतो हे तेजाचे स्वरूप आहे.

एक सुंदर शब्दचित्र किती चांगले रेखाटले आहे हे पाहण्यासारखे आहे.

*लाङ्गूल चालन मधश्चरणाव पातं । भूमौ निपत्य वदनोदर दर्शनंच ।*
*श्वा पिंडदस्य कुरुते गजपुङग वस्तु । धीरं विलोकयति चाटुशतैश्च भुङ्क्ते ॥*

कुत्रा अन्नासाठी खाली लोळण घेऊन आपले तोंड व पोट धन्याला दाखवील मात्र हत्ती चुचकारून देखील न बघता तटस्थ राहील, अत्यंत प्रेमळ बोलाने अन्नाचा स्वीकार करील. यावरून क्षुद्र माणूस व मानी स्वभावाचा माणूस यांच्या वर्तनातील फरक ध्यानात येतो. जे सांगावयाचे ते केवळ प्रतीकाने कवीने सूचित केले आहे. थोडक्यात सामान्य माणूस पैसा देव मानतो तर तत्त्वचिंतक त्यालाच लोष्टवत् मानतो.

श्रीमंत माणसाला वाईट दिवस आले असताना काय घडते याचे चित्रण.

*तानि इंद्रियाणि सकलानि तदेव कर्म ।*
*या बुद्धिरप्रति हता वचनं तदेव ।*

*अर्थोष्मणा विरहित: पुरुष:स एव*
*त्वन्य: क्षणेन भवतीति विचित्रमेतत् ।*

माणसाच्या श्रीमंत असताना ज्या गोष्टी मान्य असतात परंतु दारिद्र्य आल्यानंतर तोच माणसू त्याच गोष्टी करत असताना पार बदलून जातात. पैशाची ऊब- अर्थोष्मणा हा शब्द इथे महत्त्वाचा आहे.

विविध विषयावर भर्तृहरीचे काव्य प्रकट झाले आहे. तो एक अनुभव खालील श्लोकात रोचक पद्धतीने मांडला आहे.

*खलवाटो दिवसेश्वर किरणै: खंतापितो मस्तके*
*वाञ्छन् देशमनातपं विविधवशात् तालस्य मूलंगत: ।*
*तमाप्यस्य महाफलेन पतता भग्नं सशब्दं शिर:*
*प्रायो गच्छति यत्रभाग्य रहित: तत्रैव यान्त्यापदा: ॥*

एक टक्कल पडलेला माणूस सूर्य किरणाच्या तापापासून आपला बचाव करण्यासाठी माडाच्या झाडाखाली सावलीसाठी उभा राहिला. तेवढ्यात झावळातून निसटलेला नारळ त्याच्या डोक्यावर धप्प् असा आवाज करीत आदळला. कवी म्हणतो कमनशीबी माणूस कुठेही जावो त्याचे दुर्दैव तिथे उपस्थित होते.

दृष्टातांचा जिवंतपणा रसरशीत मांडणी आणि

कल्पनेची भेदक भरारी हे असल्या स्फुट श्लोकांचे आगळे वैभव आहे. शेवटची ओळ कुणाच्याही ध्यानात येईल व घोळत राहील इतकी सुंदर आहे.

*प्रायोगच्छति बत्रभाग्यरहित: तत्रैव यान्त्यापदा: ।*

अशी अनेक उदाहरणे देता येतील.

*मूर्खस्य नास्त्यौषधम् । ते के न जानीमहे । ब्रह्मापि नरं न रंजयति ।*

*साहित्य संगीत कलाविहीन: साक्षात् पशु: पुच्छ विषाणहीन: ।* इत्यादी.

**नीति शतकातील काही निवडक श्लोक**

हे श्लोक भर्तृहरीने केलेल्या वर्गीकरणाप्रमाणेच दिलेले आहेत. शक्य तेथे श्री वामन पंडित यांचे समश्लोक उद्‌धृत केले आहेत. हे श्लोक परिचयाचे असण्याची शक्यता आहे. हे श्लोक नित्य वाचनात असावेत या हेतूने ही योजना केली आहे.

आरंभीचा श्लोक प्रथेप्रमाणे देवता स्तवनाचा आहे. कवीने ब्रह्माला वंदन केले आहे.

*दिक्कालादि अनवच्छिन्न अनन्त चिन्मात्रमूर्तये ।*
*स्वानुभूत्यैकमानाय नम: शान्ताय तेजसे ॥*

शांत स्वरूप तेजोमय प्रभूस मी नमस्कार करतो. दिशा काल इत्यादींनी बद्ध नसलेला अनंतरूप आणि केवळ चैतन्यमय असलेला हा प्रभू असून स्वत:ची अनुभूती हेच केवळ त्याला ओळखण्याचा मार्ग आहे. येथे निराकार ब्रह्माला भर्तृहरीने वंदन केले आहे.

अल्प ज्ञानाने म्हणजे अर्ध्या हळकुंडाने पिवळे झालेले असे जे आहेत त्यांचे समाधान करणे अत्यंत कठीण हा विचार पुढील श्लोकात मांडलेला आहे.

*अज्ञ: सुखमाराध्य: सुखरतरमाराध्यते विशेषज्ञ: ।*
*ज्ञानलव दुर्विदग्धं ब्रह्माऽपि नरं न रञ्जयति ॥ १ ॥*

अडाणी माणसाचे समाधान करणे सोपे असते. शहाण्याचे समाधानही सहज शक्य होते. अर्धवट ज्ञानाने गर्विष्ठ झालेल्या माणसाचे समाधान करणे ब्रह्मदेवालाही शक्य होत नाही.

मूर्ख माणसाचे समाधान करणेही किती अवघड याबद्दल खालील दोन श्लोक

*प्रसह्य मणिमुद्धरेन्मकरवक्त्रदंष्ट्रान्तरात्*
*समुद्रमपि संतरेत् प्रबल दुर्मिमालाकुलम् ।।१॥*

*भुजङ्गमपि कोपितं शिरसि पुष्पवत् धारयेत् ।*
*न तु प्रतिनिविष्ट मूर्खजनचित्तमाराधयेत् ॥ २ ॥*

सुसरीच्या दाढेतून एकवेळ रत्न बळेच ओढून काढता येईल, उसळत्या लाटांनी खवळलेला समुद्र तरून जाणेही कदाचित जमेल, संतप्त सापालाही आपल्या डोक्यावर घेता येईल परंतु मूर्ख माणसाचे मन कुणालाही आवरता येणार नाही.

*लभेत सिकतासु तैलमपि यत्नत: पीडयन्*
*पिबेत् च मृगतृष्णिकासु सलिलं पिपासार्दित: ॥*

*कदाचिदपि पर्यटन् शशविषाण मासादयेत्*
*न तु प्रतिनिविष्ट मूर्खजनचित्तमाराधयेत् ॥ ३ ॥*

**समश्लोकी -**

*प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलहि गळे*
*तृषार्ताची तृष्णा मृगजळ पिऊनीहि वितळे*
*सशाचेही लाधे विपिन फिरता शृंगहि जरी*
*परंतु मूर्खाचे हृदय धरवेना क्षणभरी ॥*

प्रयत्न केला तर वाळूच्या कणाला पिळून तेल निघू शकेल, तहानेने व्याकुळ झालेल्या माणसाची तहान

मृगजळाने भागू शकेल, अरण्यात भटकता एखादे वेळी सशाचे शृंग मिळू शकेल परंतु हटवादी मूर्ख माणसाच्या मनाची समजूत घालणे दुरापास्त.

विद्वत् जनाच्या सभेत अडाणी माणसाने मौन धारण करावे हे बरे. खालील श्लोकात हाच विचार मांडण्यात आलेला आहे.

*स्वायत्तमेकान्तहितं विधात्रा । विनिर्मितं छादनमज्ञताया :।*
*विशेषत: सर्वविदांसमाजे । विभूषणं मौनमपाण्डितानाम् ॥४॥*

सृष्टी निर्मात्याने आपले अज्ञान लपविण्यासाठी एक सुंदर झाकण निर्माण करून ठेविले. त्याचे नाव मौन. विशेषत: विद्वान लोकांच्या सभेत मूर्खांना ते जणू एक भूषणच ठरले आहे. अल्प ज्ञान असलेला माणूस कसा असतो याचे रेखाटण खालील श्लोकात कवीने केले आहे.

*यदा किंचिज्ञोऽहं द्विप इव मदान्ध: समभवं*
*तदा सर्वज्ञोऽस्मीत्यभवदवलिप्तं मम मन: ।*

*यदा किंचित् किंचित् बुधजन सकाशात् अवगतं*
*तदा मूर्खोऽस्मीति ज्वर इव मदो मे व्यपगत: ॥५॥*

जेव्हा मला थोडे थोडे ज्ञान झाले. तेव्हा मी माजलेल्या हत्तीप्रमाणे मदोन्मत्त झालो. मी सर्वज्ञ झालो अशी धारणा होऊन मी मस्तवाल झालो. परंतु जाणत्या लोकांशी जसा जसा माझा संबंध वाढत गेला व त्यांच्या ज्ञानाची खोली लक्षात आली त्यावेळी औषधाने ज्वर जावा तसा माझा गर्वही जिरून गेला.

उत्तम पदापासून च्युत झाले असता अविचारी माणसाची कशी अधोगती होते हे एका दृष्टांताने कवीने या श्लोकात स्पष्ट केले आहे.

*शिर: शार्वं स्वर्गात् पतति शिरसस्तत्क्षितिधरं*
*महीध्रात् उत्तुङ्गात् अवनिमवनेश्चापि जलधिम् ।*
*अधोऽधो गङ्गेयं पदं उपगता स्तोकमथवा*
*विवेकभ्रष्टानां भवति विनिपात: शतमुख : ॥६॥*

गङ्गा ही स्वर्गातून प्रथम महादेवाच्या मस्तकावर पडली, मस्तकावरून हिमालयावर पडली मग तेथून उंच पर्वतावरून खाली आली (सखल भागी) शेवटी समुद्रातील तळ गाठला म्हणजे पाताळात गेली (भगीरथाने सगरपुत्रांच्या उद्धारासाठी गंगा स्वर्गातून पाताळात नेली अशी आख्यायिका आहे त्यावर हा श्लोक आधारित असावा.) ज्याचा विवेक सुटला तो उंच जागेवरून घसरतो व त्याचा शेकडो मार्गांनी अध:पात होतो.

वरील दृष्टान्तावरून विवेकभ्रष्ट झाले असता त्याचे अध:पतन कसे होते हे स्पष्ट केले आहे. **विवेकभ्रष्टानां भवतिविनिपात: शतमुख:** ॥ ही ओळ एका म्हणी प्रमाणे अनेक वेळा उपयोगात आणली जाते. हा दृष्टान्त उदाहरण म्हणूनच देण्यात आलेला आहे. विवेक भ्रष्टांचा अध:पात येणेप्रमाणे होतो इतकाच दृष्टान्ताचा उपयोग आहे.

(क्रमश:)


**- शं.बा.मठ**
६, कुमार आशिष,
राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.

**प्रतिक्रियांसाठी**
**दूरध्वनी**
☎ २५४२ ६२७०

# 'माहिती तंत्रज्ञानातून व्यवसायक्षमतांचा विकास'

*अमरावती येथे ४ फेब्रुवारी २००५ रोजी झालेल्या 'इंडियन सोसायटी फॉर एज्युकेशन' या संस्थेने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय* "Convension of Maharashtra and Goa Section and National Seminar on Revamping technical education, to make synergistic with in information revolution" *या परिषदेत वि.प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनाचे प्राचार्य दि.कृ. नायक यांनी सादर केलेला निबंध. अमरावतीच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात सादर झालेल्या या निबंधाचा स्वैर भावानुवाद प्रा. मोहन पाठक यांनी केला आहे.*

\- संपादक




अभियांत्रिकी शाखेतील पदविका धारकांकरिता असणाऱ्या विविध व्यवसाय संधी या संबंधीचा विचार या शोधनिबंधात मांडला आहे. अभियांत्रिकी शाखेतील शिक्षण हे दिवसागणिक महाग होत चाललेले असल्याने पदवी वा पदव्युत्तर स्तरापर्यंत शिकणे, असे शिक्षण आपल्या पाल्याने घेणे हे पालकांच्या आर्थिक क्षमतांपलिकडे होत चालले आहे.

एकाच उद्योगात रहाता येण्याचे दिवसही झपाट्याने कमी होत चालले आहेत. या पार्श्वभूमीवर पदवीधारक अभियंत्यांना स्वत:तील क्षमता या भविष्यकाळातही स्वत:ला व्यवसाययोग्य सिद्ध करण्यासाठी सक्षम ठेवाव्या लागत आहेत. जागितकीकरण्याचा प्रभाव, तंत्रज्ञान बाद होण्याचे गतिमान चक्र व अनेक स्तरांवर होणारे यांत्रिकीकरण (संगणकीकरण) यामुळे नेहमींच्या (पारंपरिक) कौशल्यांना असणाऱ्या संधी कमी कमी होत चालल्या आहेत. अनेक पेढी विशेषीकरणाशी संबंधित असणाऱ्या कौशल्यांना मागणी आली आहे.

तांत्रिक शिक्षणसंस्थांसमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे भविष्यातील मागणीच्या शक्यता लक्षात घेऊन स्वत:ला (सातत्याने) बदलत रहाणे, सिद्ध करणे हे होय! उद्योगधंद्यांच्या गरजेनुसार मनुष्यबळ तयार करणे व त्या दृष्टीने या बदलत्या गरजांचा विचार करणे या शैक्षणिक संस्थांना अनिवार्य ठरत आहे.

या दृष्टीने शैक्षणिक संस्थेतील प्रत्येक विभागाला प्रशिक्षण व व्यवसाय उपलब्धीच्या दृष्टीने नियमित रीतीने औद्योगिक सहलींचे आयोजन करणे क्रमप्राप्त ठरत आहे. यातून विद्यार्थ्यांना आजच्या औद्योगिक क्षेत्राचा परिचय होत आहे. याचबरोबर गरजू विद्यार्थ्यांना योग्य व्यवसाय उपलब्धीही प्रत्येक विभागास करून द्यावी लागत आहे. विभागीय ग्रंथालयातून विविध माहिती साधने उपलब्ध झाल्यास विद्यार्थी त्यांच्या सहाय्याने प्रकल्पाधारित अर्ज करू शकतो.

वरीलपैकी सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे प्रत्येक विभागात संगणक व इंटरनेटची उपलब्धी असणे, की जी आजची महत्त्वपूर्ण शैक्षणिक साधने आहेत. केवळ अध्ययन प्रक्रियेतच नव्हे तर याचा उपयोग ई-मेल व वेबसाईटच्या सहाय्याने प्रभावी संप्रेषण व संवादासाठी होत आहे.

### पदविकाधारकांसाठी माहिती व तंत्रज्ञानातील संधी

### आजचे चित्र

अभियांत्रिकी पदविकाधारकांसाठी प्रत्येक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात व्यवसाय संधी आहेत. नागरी भागातील शिक्षण संस्थांना सातत्याने बदलणाऱ्या गरजांच्या दृष्टीने प्रशिक्षित मनुष्यबळ मिळण्याच्या दृष्टीने औद्योगिक क्षेत्राचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. उद्योगांच्या विविध क्षेत्रातील व्यवसाय संधी आव्हानात्मक असून संवाद व बौद्धिक कौशल्यांना खूप मागणी आहे. भविष्य काळातही हाच प्रवाह असेल असे दिसते.

व्यावसायिकांना इंटरनेट हे वरदान ठरत असून स्वयंअध्ययनासाठी व छापील संप्रेषणासाठी ते उपयुक्त ठरत आहे. (व्यवसाय) संधी शोधणाऱ्यांसाठी दळवळणाच्या महाग व वेळखाऊ पारंपरिक पद्धतींची आवश्यकता आता राहिली नाही.

अभियांत्रिकी पदविकाधारकांना विशेषीकरणाशिवाय आपल्या इतर कामांसाठी संगणकाचा वापर करण्याची कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक ठरत आहे. संगणक हे कार्यतत्परता वादविण्यास साहाय्यक ठरत असल्याने त्याच्याशिवाय या अभियंत्यांना आपल्याला नेमून दिलेल्या कामगिरी पूर्ण करता येणार नाही.

प्रत्येक पदविकाधारकाने प्रयोगशाळेपलीकडील काही कौशल्ये आत्मसात करावयास हवीत. सेवा उद्योगातील काही उद्योगांनी अशा विशेष प्रकारच्या विषयांचे कार्यक्रम व त्यातील प्रशिक्षणांना सुरुवातही केली आहे. यातील काही कार्यक्रमातील कौशल्ये पुढीलप्रमाणे :

| पदविका | प्रशिक्षणसाध्य कौशल्ये |
|---|---|
| १. औद्योगिक इलेक्ट्रॉनिक्स | औद्योगिक साधने, पी.एल्.सी.ज्, मायक्रो कंट्रोलरबेस सिस्टिमस. |
| २. इन्स्ट्रुमेंटेशन | पीएलसीज्, स्काडा, पीसीबेसड इन्स्ट्रुमेंटेशन |
| ३. संगणक अभियांत्रिकी | संगणक संरचना, ट्रबल. शूटिंग सॉफ्टवेअर बसविणे, नेटवर्क व्यवस्थापन इ. |
| ४. स्थापत्य अभियांत्रिकी | संगणकाधारित डिझाईन व ड्राफ्टींग, सिम्युलेशन मॉडेलिंग |

पदविकाधारक अभियंत्यांना आपले उद्योजक स्वीकारतात कारण आधुनिक तंत्रज्ञानात त्यांचे प्रशिक्षण झालेले असते. इ-अध्ययन व इतर मार्गांनी विद्यार्थ्यांना याची माहितीही मिळते. विशेषीकृत विषयांचे अल्पमुदतीचे अभ्यासक्रम त्यांना उद्योगधंद्याच्या अपेक्षेबरहुकूम बनण्यास मदत करतात.

आय.टी.आय. प्रमाणपत्रधारक तंत्रज्ञ, पदविका धारक पर्यवेक्षक व अभियंते व्यवस्थापक या संकल्पना हळूहळू बदलत आहेत. प्रगत तंत्रज्ञान व कार्यशाळेत (वर्कशॉप) प्रत्यक्ष लागणाऱ्या मनुष्यबळात झालेली घट यामुळे अभियंत्यांकडून अधिक कौशल्यांच्या अपेक्षा वाढत चालल्या आहेत. प्रवेश करतानाच या क्षेत्रातील अद्ययावततेबाबत असणारी जाणीव असेल तरच एखाद्या कामाबद्दल योग्य समजले जाऊ लागले आहे. आयटीआय स्तरावरच्या कौशल्यांचा पुनर्विचार न झाल्यास या पदविकाधारकांचे काम 'अप्रशिक्षित' या सदरात गणले जाईल. आजच्या गरजांच्या संदर्भात पदविका स्तरावरील शिक्षणच अधिक योग्य ठरेल कारण तंत्रज्ञानाचे तपशील व त्याच्याशी परिचय आणि संवाद कौशल्ये ही आज आवश्यक आहेत.

अभियांत्रिकी शाखेतील पदविका या शैक्षणिक अर्हतेमुळे पदविकेनंतरच्या अनेक अभ्यासक्रमांसाठी नाव नोंदवून व्यवसाय या दृष्टीने आवश्यक त्या अर्हतेची प्राप्ती करून घेता येते. पदव्युत्तर अभ्यासक्रमांचा रोख विशेषीकरणाकडे असतो. व्यवसाय सांभाळून हे अभ्यासक्रम करता येऊ शकतात. पदविकाधारकांनी आपला विशेषीकरणाच्या अभ्यासाचा पर्याय निवडून उच्च शिक्षण प्राप्त केल्यास त्यांचे भविष्य भविष्यकालीन संधींच्या उपलब्धतेमुळे अधिक उजळू शकते.

अभियंत्यांना पुढील क्षेत्रांतही वाव वाढू लागला आहे.

- ☆ उमदे पर्यवेक्षक
- ☆ नेटवर्क व्यवस्थापन
- ☆ गुणवत्ता आश्वासन व व्यवस्थापन
- ☆ सॉफ्टवेअर व्यवस्थापन
- ☆ हार्डवेअर व्यवस्थापन
- ☆ प्रक्रिया व्यवस्थापन
- ☆ देखभाल व्यवस्थापन
- ☆ मनुष्यबळ सुरक्षा
- ☆ विभाग सुरक्षा
- ☆ उत्पादनांची हमी
- ☆ उत्पादन तंत्रांचा विकास
- ☆ नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्यास सातत्यपूर्ण विकास
- ☆ मनुष्यबळ विकास
- ☆ संस्थांतील बदल

अभियांत्रिकी अभ्यासक्रमात देशभरच नवीन आव्हानांना सामोरे जाण्याच्या दृष्टीने आमूलाग्र बदल घडत आहेत.

अखिल भारतीय तंत्रशिक्षणपरिषदेने विद्यमान सेवासुविधा नव्या कल्पनांना साजेशा ठरण्याच्या दृष्टीने काही निकष निश्चित केले आहेत. संस्थांमधील अध्यापकांना नव्या जुन्यातील अंतर भरून निघावे या दृष्टीने पुन: प्रशिक्षण दिले जात आहे. पुन:प्रशिक्षणाचे नित्याने होणारे वर्ग नवीन विषयांचे अध्यापन सुलभतेने करण्यास सहाय्यभूत ठरत आहेत. दर्जात्मक शिक्षण दिले जावे यासाठी अध्यापकांची नेमणूक करण्यासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने नेमून दिलेले निकष उपयुक्त ठरत आहेत. या परिषदेने ठरवून दिलेल्या वेतन श्रेणीही काळाच्या ओघात सुधारल्या असून विविध विद्यापीठांतील निष्णात मनुष्य बळाला आकर्षक वाटाव्यात अशा आहेत.

मूल्यमापन करून घेण्याची गरज महत्त्वपूर्ण ठरत असून अनेक शिक्षण संस्था याचा प्राधान्याने विचार करीत आहेत. अनेक अभियांत्रिकी शिक्षण संस्थांनी असे मूल्यमापन करून घेतले आहे, तर काहींची या दिशेने प्रक्रिया चालू आहे. विद्यमान सुविधांचा योग्य त्या दृष्टीने व ध्येयाने दर्जा सुधारणे यांसाठी याचा उपयोग होत आहे. मूल्यमापनाच्या तयारीसाठी आखाव्या लागणाऱ्या दूरलक्ष्यी धोरणांचा विद्यार्थी व अध्यापकात बांधिलकी निर्माण करण्यात व दृष्टिकोण बदलण्यास उपयोग होत आहे. भविष्यातील अभियंत्यांना योग्य प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने संस्थांचा विकास होण्याच्या दृष्टीने हे पायाभूत प्रयोग ठरत आहेत.

जागतिक स्पर्धेसाठी स्वत:ला तयार करणे हे या शिक्षण संस्थांना अनिवार्य ठरत आहे, अन्यथा त्यांच्या अस्तित्वाला धोका आहे. सर्व स्तरांवर जबाबदारी असणाऱ्या उद्योगांप्रमाणेच यापुढे उच्च शिक्षणाकडे पाहिले जाणार आहे. तटस्थ व काटेकोर कार्य अहवालाबरोबर दर्जात्मक शिक्षणाची शाश्वती व ध्येयप्रेरित प्रागतिक विकास हे प्रत्येक शिक्षणसंस्थेचे उद्दिष्ट असणार आहे.

समान ध्येय धोरणे असणाऱ्या इतर घटकांशी संस्थांना समन्वय साधावा लागणार आहे. यातून सेवासुविधा व मनुष्यबळाचा प्रभावी वापर करून अधिक संपत्ती निर्माण करता येणार आहे. अधिक नेमकेपणाने सांगावयाचे झाल्यास, संस्थांना आदर्श सेवा सुविधा व्यावसायिक पद्धतींनी उपलब्ध करून स्वत: आदर्शाचा वस्तुपाठ म्हणून सिद्ध व्हावे लागणार आहे.

**माहिती तंत्रज्ञानातील सुविधा-**

माहिती तंत्रज्ञानास लागणारे पायाभूत घटक पुरविण्याची निरोगी स्पर्धा आज शिक्षण संस्थात आढळते. आवर्ती व अनावर्ती अर्थ सहायातील मोठा भाग या उत्तेजन वाढविणाऱ्या शिक्षणासाठी वेगळा राखून ठेवला जात



प्राचार्य दि.कृ. नायक आपला शोध निबंध सादर करताना

आहे. अभियांत्रिकीच्या प्रत्येक शाखेत माहिती तंत्रज्ञानाचा शिरकाव झालेला असल्याने सर्व विभागाला हे तंत्रज्ञान अनिवार्य ठरत आहे. तंत्रशास्त्राच्या अध्ययनासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर निश्चितच उपयुक्त ठरणार आहे.

पूर्वी केवळ ग्रंथांचा साठा असणारी ग्रंथालये आज इ-अध्ययन केंद्रे बनत आहेत. ग्रंथालये डिजिटल होत असून जगातील कोणतीही माहिती सहज उपलब्ध होत आहे. विद्वानांना आवश्यक वाटणारी माहिती बोटांच्या टोकावर उपलब्ध होत आहे. या सर्व घटकांचा गतिमान व दर्जेदार अध्ययन पद्धतीत उपयोग होत आहे.

माहिती तंत्रज्ञानातील सुविधांची उपलब्धी शिक्षकांच्या अध्ययनातील तणाव कमी करत आहे. इ-अध्ययन संकल्पनेतील पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन, विषयांच्या सीडी अशा तांत्रिक उपलब्धींमुळे अध्ययन व अध्यापन हे आनंददायी ठरत आहे. कमी वेळात विद्यार्थ्यांना अधिक ज्ञान देणे शक्य होत आहे. वेब साईटच्या माध्यमातून अभ्यासक्रम व संबंधित साहित्य दिल्याने काम अधिक सुलभ होत आहे. शिक्षकांशी संवाद साधू न शकणारे विद्यार्थी किंवा हे ज्यांना जड जाते असे विद्यार्थी इ-मेल व

इंटरनेटच्या माध्यमातून संवाद साधू शकतात.

थोडक्यात पारंपरिक वर्गाचे रुपांतर प्रशिक्षण केंद्रात होऊन एकाच वेळी व्हर्च्युअल वर्गातून शिकविणे शक्य होणार आहे. विद्यार्थ्यांवरील ताण कमी होणे व योग्य रीतीने वापर केल्यास उत्तम निकाल मिळणे यामुळे शक्य होणार आहे.

**औद्योगिक केंद्र व शिक्षण संस्था संबंध**

माहिती तंत्रज्ञान प्रशिक्षित अभियंत्यांमुळे उद्योगक्षेत्राचा प्रचंड फायदा घेत आहे. त्यामुळे उद्योगधंदे शिक्षण संस्थांना शिक्षणक्रमातील बदल, प्रयोगशाळा सुधारणाबाबत सल्ला देत आहेत. त्याबरोबरच औद्योगिक सहली आणि यंत्रसंचविभागातील प्रशिक्षण यांनाही प्रोत्साहन देत आहेत. शिक्षणसंस्थामधील शिक्षण प्रक्रियेबद्दलचे हे वाढते भान उद्योगक्षेत्रात निर्माण झाल्याने उद्योजक आवश्यक ते बदल करण्यासंबंधी सूचना देत आहेत. त्यामुळे उद्योग क्षेत्राला नव्याने प्रशिक्षित झालेले व माहिती तंत्रज्ञानाची कौशल्ये असणारे अभियंते मिळत आहेत.

संवाद कौशल्ये, सर्वसामान्य कौशल्ये, प्रकल्प व्यवस्थापन, परिसंवाद व सादरीकरण अशा विषयांच्या परिचयामुळे अभियंत्यास व्यक्तिमत्त्वाचा विकास साधणे शक्य होत आहे. उद्योगक्षेत्रातील तज्ज्ञांना शिक्षणसंस्थेत बोलावून विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधण्याच्या संधीमुळे विशेष विषयांवरील त्यांच्या व्याख्यानांमुळे शिक्षण प्रक्रिया समृद्ध तर होते आहेच शिवाय उद्योगक्षेत्रासाठी फायदा होत आहे.

अशाप्रकारे एकत्रित कार्यक्रमांमुळे उभयपक्षी फायदा होण्याच्या शक्यतेमुळे उद्योग क्षेत्रांशी हातमिळवणी करण्याचा प्रवाह भविष्यात दिसत आहे. शिक्षणसंस्थातील विद्यार्थी उद्योगधंद्याच्या दृष्टीने शिकत असतानाही उपयुक्त ठरत आहेत. काही गरजू विद्यार्थी अर्धवेळ काम करू शकतील तर सुटीच्या दिवसात पूर्णवेळ काम करणेही त्यांना जमू शकेल. यामुळे शिक्षणाचा खर्च भागविणे विद्यार्थ्यांना शक्य होईल तर उद्योगधंद्यांनाही त्यांच्या सेवांपासून लाभ होईल.

वरील सर्व विषयांच्या चर्चेतून गेल्या दोन शतकात शिक्षणपद्धती कशी बदलत आहे ते लक्षात येईल. प्रशिक्षण व व्यवसाय संधी बरोबरच मिळतील असे आजचे चित्र आहे. आवश्यक ती कौशल्ये आत्मसात करून जगभर उपलब्ध असणाऱ्या चांगल्या व्यवसाय संधी प्राप्त करून घेणे यासाठी अभियंत्यांकरिता ही उत्तम वेळ आहे.

गेल्या दशकात तंत्रकौशल्ये विकसित झालेल्या उमद्या उमेदवारांना मोठ्या प्रमाणात मागणी होती. इंटरनेट व इ-मेलच्या माध्यमातून संभाव्य नोकरी देणाऱ्यांपर्यंत पोहोचणे विद्यार्थ्यांना आज शक्य आहे. अनेक संस्था टेलीइंटरव्ह्यू, कॉनफरन्सिंग इंटरनेटच्या माध्यमातून आयोजित करीत आहेत. त्यामुळे अभियंत्यांना बहुमोल वेळ, पैसा व शक्ती वाचविणे शक्य झाले आहे.

उत्पादन, दर्जा, किफायतशीरपणा, वापरण्यातील सुलभता, सुरक्षितता, खात्री हे नवीन तंत्रज्ञानाचे उद्देश बनले आहेत. या बाबींमुळे स्वत:ला अद्ययावत ठेवणे हे अभियंत्यांना शक्य होत आहे व होत राहील.

आजच्या तंत्रज्ञानाचे चित्र व औद्योगिक वातावरण यामुळे कुशल अभियंत्यांना व्यावसायिक सुरक्षा मिळेल व बदलत्या प्रवाहांशी सतत जुळवून घेणेही शक्य होईल.

प्राचार्य दि. कृ. नायक

भावानुभव- मोहन पाठक

**आपल्या प्रतिक्रिया जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.**

- संपादक

**पुस्तक परिचय**

# गीता विज्ञाननिष्ठ निरूपण

*मूळ श्लोक, शब्दश: भाषान्तर आणि सत्याला स्मरून*

*सद्य: स्थितीच्या युद्धभूमीवर आजच्या भारतासाठी असलेले वास्तववादी विवेचन*

लेखक : डॉ. प.वि.वर्तक M.B.B.S.

प्रथमावृत्ती - १८ नोव्हें. १९९०

कुठलेही पुस्तक हातात घेतले की प्रथम दर्शनी दिसते ते पुस्तकाचे नाव मधे नावाला साजेसे रेखाचित्र किंवा छायाचित्र आणि त्याखाली लेखकाचे नाव. (निदान शीर्षकाखाली असते) पण या पुस्तकाचे वेगळेपण त्याच्या मुखपृष्ठापासून दिसून येते. मुखपृष्ठभर मोराचे सुंदर हिरवेगार मोरपिस. त्या मोरपिसाच्या डोळ्यात लेखकाचे छायाचित्र. वर लेखकाचे नाव. खाली तळाला पुस्तकाचे नाव. मुखपृष्ठाच्या आतील कव्हरवर दिवंगत पत्नीचा फोटो व काव्यांजली. मलपृष्ठावर लेखकाचा परिचय. आतील कव्हरवर लेखकाचे इतर प्रकाशित ग्रंथ.

मुखपृष्ठांची कल्पना : गीता कृष्णाची. कृष्ण म्हणजे मोरपिस. निरूपण डॉ. वर्तकांचे म्हणून मोरपिसाच्या डोळ्यात यांचे चित्र डॉ. वर्तक.

पुस्तकाला अनुक्रमणिका नाही. लेखक परिचय, मनोगत, गीता पार्श्वभूमी.

राजहंसाची जशी आकाशात, पृथ्वीवर आणि जलाशयात अशी सर्वत्र सुरेख गती असते तशीच डॉक्टरांची सुद्धा सर्व शास्त्रांमध्ये सारखीच गती आहे. बालपणापासून श्रीमंतीत वाढलेले असूनही त्यांचा ओढा अध्यात्माकडे होता ही नवलाची गोष्ट आहे. शंकर, दत्त, राम, कृष्ण, विष्णू, देवी इ. सर्व देवांचे साक्षात्कार त्यांना झालेले आहेत व आत्मसाक्षात्कार ही घडला आहे. संसारात राहून त्यांनी प्रपंच व परमार्थ साधला. त्यांच्या यशाचे निम्मे श्रेय ते पत्नीला देतात. ध्यानात लिंग देहाने मंगळावर, गुरुवर जाऊन तेथील परिस्थिती अवकाशयानापूर्वीच प्रसिद्ध केल्याने व ती अचूक ठरल्याने त्यांना जागतिक कीर्ती लाभली आहे. दिव्यदृष्टी असलेले आधुनिक साक्षात्कारी संत, प्राचीन भारतीय विद्यांचे संशोधक, 'स्वयंभू' ह्या भीमावरील पहिल्याच पुस्तकात महाभारतावर अस्सल संशोधन करून तारखा निश्चित करणारे, 'वास्तव रामायण' यात भारताचा पंधरा हजार वर्षांचा इतिहास सुसंगत मांडणारे व रामाची जन्म तारीख ज्योतिषाच्या आधारे शोधणारे, 'उपनिषदांचे विज्ञाननिष्ठ निरुपण या स्वानुभवपूर्ण ग्रंथाने अध्यात्मिक अधिकार सिद्ध करून आधुनिक ऋषी अशी मान्यता पावलेले 'पातंजलयोग विज्ञाननिष्ठ निरुपण' या ग्रंथाने योगशास्त्रावरील प्रभुत्व सिद्ध करणारे पुण्यातील प्रथितयश सर्जन डॉ.प.वि.वर्तक यांच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेला असा हा अमूल्य ग्रंथ आहे.

या ग्रंथाचा दृष्टिकोन सत्याचा व विज्ञानाचा आहे. कृष्णाचेच सत्य बघत असल्यामुळे शंकराचार्य, ज्ञानेश्वर, लो.टिळक काय म्हणतात ते मी पाहिलेले नाही. केवळ गीता वाचून हे निरूपण केले त्यासाठी भोवतालची परिस्थिती पाहून तुलना केली असे लेखकाचे म्हणणे आहे.

महाभारत भीष्मपर्वात केशव - ६२० श्लोक, अर्जुन - ५७ श्लोक, संजय - ६७ श्लोक, धृतराष्ट्र - १ श्लोक असे एकूण ७४५ श्लोक गीतेत आहेत. पण आज कृष्ण - ५७४, अर्जुन - ८४, संजय - ४१ व धृतराष्ट्र - १ असे एकूण ७०० श्लोक आहेत. कृष्णाचे ४५ तर संजयाचे २५ श्लोक हरवले आहेत व अर्जुनाचे २० श्लोक वाढले आहेत. यावर संशोधन करावे लागेल.

सत्याचा प्रकाश टाकून भूतकालीन चुका शोधल्या आहेत. व्यक्तीला ठेच लागली तर चालते पण राष्ट्राला ठेच बसणे परवडत नाही, तेवढ्यासाठीच मी राष्ट्रीय दृष्टिकोन ठेऊन निरुपण केले आहे, असे मनोगतात लेखकाने म्हटले आहे.

संजयाला व्यासांकडून दिव्य दृष्टी मिळाली. पण येथे दूरदर्शनप्रमाणे राजवाड्यात बसून संजय युद्ध बघत नव्हता तर रणांगणावर जाऊन तो युद्ध प्रत्यक्ष जड नेत्रांनी पहात असे. पण चर्मचक्षुंनी युद्धाच्या धुमश्चक्रीत काय चालले आहे ते लांबून दिसत नसे व तेथे आत शिरले तर मरण्याची भीती. अशाचवेळी तो दिव्यदृष्टी वापरीत असे व घटना पाहून ठेवीत असे. घरी आल्यावर त्या घटना धृतराष्ट्राला सांगत असे. संजयाने धृतराष्ट्राला युद्धाची माहिती दहाव्या दिवशी भीष्म रणांगणी पडल्यावर सांगण्यास सुरुवात केली हे महाभारत (भीष्मपर्व) नीट वाचल्यास स्पष्ट दिसते. भीष्म पडले असे सांगताच संजय धृतराष्ट्राकडे आला. त्यावेळी सर्व माहिती नीट मिळवण्याच्या हेतूने धृतराष्ट्र संजयाला विचारू लागला की, 'युद्धाच्या इच्छेने कुरूक्षेत्रावर एकत्र आलेल्या कौरव पांडवांनी काय केले?'

कुरुक्षेत्र दिल्लीजवळील अगदी छोटे धर्मक्षेत्र आहे. तिथे अठरा अक्षौहिणी म्हणजे ४० लाख सैन्य कसे मावले? याचे गणिती उत्तर ग्रात लेखकाने दिले आहे.

एक अक्षौहिणी म्हणजे - एक लक्ष, नऊ हजार, तीनशे पन्नास पदाति, पासष्ट हजार सहाशे दहा घोडे, २१८७० रथ व तितकेच हत्ती. वगैरे वगैरे मूळ पुस्तकातून वाचणेच योग्य होईल.

अध्याय ३ रा श्लोक ९ मध्ये 'यज्ञ' शब्द आलेला आहे.

*यज्ञार्थात्कर्मण: अन्यत्र लोकोऽयं कर्मबंधन : ।*
*तदर्थं कर्म कौन्तेय मुक्तसंग: समाचर ॥ ३.९*

यज्ञ हा शब्द आदराने देणे, अर्पण करणे, पूजा करणे या अर्थी आलेला आहे. (यज्ञ शब्दात यज् हा धातू आहे) श्रेष्ठांची पूजा मग ते माता, पिता, गुरू, समाज, राष्ट्र, देश हे तर आलेच पण त्याहून श्रेष्ठतर पृथ्वी, सूर्य, ग्रह, तारे, विश्व, ब्रह्म, परब्रह्म हे सगळे पूजनीय आहेत. या सर्व शक्ती आहेत. त्यांची पूजा करायची तर त्यांना काही दिले (अर्पिले) पाहिजे. ते द्यायचे कसे? मग कुणा तरी शक्तीला त्यांचे प्रतिक मानले पाहिजे. अग्नि मधे तेज, वायू, आकाश ही महाभूते असून सर्वांचे प्रतीक होण्यास तो योग्य ठरतो म्हणून अग्नीला सर्व शक्तींचा सर्व देवांचा प्रतीक मानले आहे. अग्निला दिले तर त्यांना मिळते असे मानून अग्निला आहुती देणे म्हणजे योग्य ते देऊन पूजा करणे होय. ज्यांच्यापासून आपण बनलो ज्यांच्यामुळे आपण जगतो त्या पंचमहाभूतांना व त्यांच्यावर अधिकार चालवणाऱ्या मूलशक्तींना काहीतरी देऊन काही अंशी ऋणमुक्त होण्याची कल्पना या क्रियांमध्ये आहे म्हणून त्याला यज्ञ म्हणतात. यज्ञचा मुलभूत अर्थ आदराने देणे हाच येथे कृष्णाला अभिप्रेत आहे. यज्ञ म्हणजे विष्णुला देणे असाही अर्थ काही विद्वान काढतात पण विष्णु म्हणजे कुणी देहधारी देव नव्हे. विष्णु-विष् सर्व व्यापणे हा धातू. विश्वात सर्वत्र व्यापून राहिलेले तत्व म्हणजे विष्णु. यालाच विश्वंभर म्हणतात. ब्रह्मतत्व ते हेच.

त्या विष्णूला द्यायला वस्तू हवी असे नाही. काही चांगले कार्य केले तरी ते देणेच होते. विष्णू सर्वत्र सर्व प्राणिमात्रात आहेच. कोणालाही काहीतरी देणे म्हणजेच

यज्ञ. हाच अर्थ कृष्णाने पुढे अध्याय ४, श्लोक २६, २७, २८, २९, ३०, ३१ येथे घेतला आहे असे डॉ. वर्तक म्हणतात.

अध्याय ३ मध्येही ९, १०, ११, १२, १३, १४, १५ श्लोकात यज्ञाबद्दल बरेच विज्ञाननिष्ठ निरूपण लेखकाने केलेले आहे. त्याचा थोडा नमुना वर निदर्शनास आणला आहे. वाचकांनी तो मूळातून संपूर्ण वाचावा.

अध्याय ९, श्लोक ३० पहावा व त्यावरील डॉ. वर्तकांचे विवेचन विज्ञाननिष्ठ निरुपणाचा भाग म्हणून मुद्दाम लक्षपूर्वक वाचावे.

*अपिचेत सुदुराचार: भजतो मां अनन्यभाक् ।*
*साधु: एव स; मन्तव्य: सम्यक् व्यवसित: हि स: ॥ ९.३०*

आणि जर कोणी अतिशय दुराचारी अनन्यभावे मला भजत असेल तर तो साधूच मानावा कारण तो नीटपणे निश्चयी झालेला असतो.

येथे मला पुन्हा कृष्णावर बुवाबाजीचा आरोप करावा लागत आहे. (मागे २२ व्या श्लोकातही त्यांनी हाच आरोप केला आहे) केवळ कृष्णाची अनन्य भावाने पूजा करतो म्हणून पापी माणसाला सुद्धा साधू म्हणावे हे विधान बुवाबाजीचेच द्योतक आहे. अध्यात्मविद्येच्या पूर्ण विरोधात आहे. आचरण व कर्मे यावरच सर्व काही अवलंबून आहे असे सर्व ऋषीमुनींनी आत्मज्ञानी लोकांनी सांगितले आहे. येथे मात्र त्याने एकदम कोलांटी उडी मारली आहे. 'माझी भक्ती करणारा दुर्जन असला तरी त्याला साधू म्हणावे' हे विधान सुसंगत वाटत नाही म्हणूनच ते कृष्णाने स्वत: केले नसावे, ते कुणीतरी कृष्णभक्त दुर्जनाने गीतेत घुसडले असावे असे वाटते. त्यामुळे बुवाबाजीला खतपाणी मिळते, दुराचरण करायला प्रोत्साहन मिळते. दुराचरण करून कृष्णभक्ती केली तर त्याची वाईट फळे प्राप्त होणार नाहीत या समजुतीत राहतात. प्रत्यक्षात मात्र परमात्मा त्यांची कर्मफले त्यांना भोगायलाच लावतोच. त्यावेळी कृष्ण त्यांना मदत करू शकत नाही. मी हे स्पष्ट बोलतो कारण पांडवांची मुले झोपेत मारली गेली तेव्हा तो काहीही करू शकला नव्हता. हे महाभारतात प्रसिद्ध आहेच. डॉ. वर्तक पुढे म्हणतात - कृष्ण स्वत:ची कर्मफलेसुद्धा टाळू शकत नाही तो कृष्ण इतरांची कर्मफले कशी टाळू शकेल ? कृष्णाची भक्ती करत सगळेच दुराचारी झाले तर समाज कसा टिकेल? कृष्णभक्ती करत यादव माजले, दुराचरण करू लागले म्हणून शेवटी नाश पावले असे म्हटले तर माझी काही चूक होईल का? म्हणून मी तरी स्पष्ट सांगतो की कृष्णाचे हे विधान त्याज्य मानून टाकून द्यावे. त्याप्रमाणे आचरण करू नये. याबाबतीत गीतेतील या वचनावर विश्वास ठेवू नये. कृष्णभक्ती करणाऱ्या कृष्णांच्याच सोळा सहस्र बायकांचे तो स्वर्गवासी झाल्यावर रक्षण करू शकला नाही. अभिरांनी त्यांना पळवून नेले म्हणूनच तो म्हणतो की कर्मे चांगलीच करावीत. कृष्णभक्ती केली नाही तरी चालेल, पण कर्मे चांगलीच करावीत म्हणजे कसलीही भीती पुढे रहात नाही.

गीतेत अनेक ठिकाणी (पुस्तकात ती ठिकाणे दाखवली आहेत.) कृष्णाने चांगली कर्मे करावी असे दर्शविले आहे, इतकेच नव्हे तर, विनाशायच दुष्कृताम अशा भाषेत दुराचारी लोकांचा नाश करण्यासाठीच मी पुन:पुन्हा जन्म घेतो असे म्हटले आहे. ज्यांचा नाश करण्यासाठी कृष्णाने जन्म घेतला ते दुराचारी केवळ कृष्णाची भक्ती केली म्हणून साधू ठरत असतील तर ही चक्क 'पार्शालिटी' म्हणावी लागेल. पक्षपात म्हणावा लागेल. यामुळे कृष्णाबद्दलच्या भावनांना धक्का बसतो. म्हणूनच मला वाटते. हा श्लोक कुणीतरी कृष्णभक्तीचे नाटक करणाऱ्या दुराचारी माणसाने गीतेत घुसडला असावा. (पण त्या दुराचाऱ्याला गीतेतल्या सारखी श्लोक रचना संस्कृतात करता कशी आली?' ही माझी शंका) किंवा अर्जुनाला युद्धप्रवृत्त करावे या हेतुने स्वत: कृष्णानेच

बुवाबाजी जाणूनबुजून, चांगल्या हेतूने केली असावी. माझी भक्तीही करत युद्ध करून आप्तबांधवांच्या हत्येचे पाप केलेस तरी साधूच ठरशील असे त्याने अर्जुनाच्या मनावर बिंबवले हे बोलण्यात कृष्णाचा यत्किंचितही स्वार्थ नव्हता. शिवाय सत्य प्रस्थापित होणार होते व न्यायी, धर्मशील पांडवांचे राज्य निर्माण होऊन प्रजा सुखी होणार होती. कृष्णाचा हेतू वाईट नव्हता हे पुन्हा एकदा ठासून सांगतो पण तत्वज्ञान म्हणून हा श्लोक योग्य नव्हे हेही पुन्हा सांगतो.

याच ३० व्या श्लोकाच्या संदर्भातील ३१ वा श्लोक बरोबर आहे असे मी म्हणतो यात माझी विसंगती नाही. कारण 'दुराचारी सुद्धा माझी भक्ती करत असेल तर त्याला साधू म्हणावे, माझी ना नाही ! पण दुराचारी असताना साधू म्हणणे हे मला मान्य नाही. हा भेद स्पष्ट करणे माझे कर्तव्य आहे म्हणूनच वरच्या श्लोकावर मी कडक टीका केली आहे. या श्लोकानुसार दुराचरण करत कृष्णभक्ती करणारे लोक 'मी' पाहिले आहेत. ते स्वत:ला साधू समजतात. अशा अपसमजुतीत राहणारे लोक दुराचरण करत राहिले तर ते नष्ट होतात. त्यांना व सर्व सामान्यांना सावध करण्यासाठी कर्तव्य भावनेने मी वर कडक टीका केली. त्यामुळे कुणाचे मन दुखावले असेल त मी येथेच क्षमा मागतो.

*मां हि पार्थ व्यपाश्रित्य ये अपि स्यु: पापयोनय: ।*
*स्त्रिय: वैश्या: तथा शूद्रा: ते अपि यान्ति परां गतिम् ॥९.३२*

कृष्ण येथे अहंकारानेच म्हणत आहे की माझाच आश्रय घेऊन स्त्रिया, वैश्य, शूद्र इत्यादी लोक इतकेच नव्हे तर जन्मापासूनच पापी असलेले लोकसुद्धा परमगती मिळवू शकतात.

परमात्म्याला उद्देशून कृष्ण येथे 'मी'पणा दाखवत असेल तर आक्षेप नाही. पण तसे नसेल तर या वाक्यालाही माझा आक्षेप आहे. (कृष्ण म्हणजे वासुदेव, वसुदेवपुत्र म्हणून तो वासुदेव नव्हे नाहीतर बलरामालाही वासुदेव म्हणतात? वासु - विश्व Universal, देव - स्वामी soul. वासुदेव Universal Soul विश्वाचा स्वामी या अर्थी कृष्ण 'मी' म्हणतो आहे. देहधारी कृष्ण म्हणून नव्हे हे लक्षात घेतले पाहिजे.) कारण केवळ कृष्ण भक्तीने जन्मजात पापी, पापे करणाऱ्यांनी या भ्रमात राहू नये. त्यांनी कृष्णभक्ती जरूर करावी, पापे करणे ताबडतोब थांबवावे.

जन्मजात पापी लोकांच्या पंक्तीला स्त्रिया, वैश्य, शूद्र यांना येथे बसवले आहे तेही योग्य नव्हे (हा विचार माझ्याही मनात आला.) पण काव्य रचताना शब्द मागे पुढे करावे लागतात शिवाय रणांगणावर घाईत तत्वज्ञान सांगताना शब्द मागे पुढे करावे लागतात. कृष्णभक्तीने कुठल्याही वर्णाचा माणूस परमगती मिळवतो, स्त्रियासुद्धा परमगती मिळवतात हा महत्त्वाचा समतेचा मुद्दा येथे आहे.

अध्याय १६ व्यातील २३ व्या श्लोकाचे विवेचन करताना डॉ. वर्तक स्वत:चे उदाहरण देतात. जो शास्त्राने सांगितलेले विधी सोडून इच्छेनुसार वागतो त्याला यश मिळत नाही, सुख मिळत नाही आणि परमगतीही मिळत नाही. हा श्लोकाचा अर्थ ते देतात. एक शास्त्र एक विधी सांगते तर दुसरे शास्त्र उलट विधी सांगते मग अशावेळी प्रमाण कोणाचे मानायचे? शास्त्रातील विधीसुद्धा कोणाच्या इच्छेनुसारच लिहिलेले असतात. तो हेतू ओळखून कालानुरूप बदल करून जर हेतू साधला तर चुकले का? अजिबात नाही.

डॉक्टर येथे स्वत:चे उदाहरण देतात. शास्त्राने मृत्यूनंतर श्राद्ध करावयास सांगितले आहे त्याप्रमाणे पहिले चौदा-पंधरा दिवस सर्व विधी शास्त्रानुसार केले. पुढे भरणी श्राद्ध आले त्यावेळी विचार पडला हे आवश्यक आहे का? श्राद्ध हे श्रद्धेने करण्याचे कार्य आहे. श्रद्धा नसेल तर श्राद्ध करू नये. श्राद्धाच्या वेळी भटजींना दिलेले भोजन व सुवासिनींना दिलेले वाण व भोजन मृत व्यक्तीस मिळते अशी इतरांची श्रद्धा असली तरी माझी नाही. कारण ते म्हणतात

उपनिषदांचा मी अभ्यास केला आहे व त्यातून ही श्रद्धा योग्य नाही हेच निष्पन्न झाले आहे. समाजाचे ऋण अंशत: फेडण्यासाठी हे दान करायचे असते. भटजी वेदाभ्यास करून ज्ञानजतन करण्याचे अमूल्य कार्य करतात व त्यापायी त्यांना इतर व्यवसाय करता येत नाहीत म्हणून त्यांच्या पोटापाण्याच्या सोयीसाठी त्यांना भोजन व दक्षिणा द्यायची असते. एका गरीब सुवासिनीला भोजन व साडी चोळी द्यायची म्हणजेच गरिबाला दान द्यायचे असते हा हेतू लक्षात आल्यावर त्यांनी त्यांच्या कॅन्सरने निवर्तलेल्या पत्नीसाठी आणलेली पाच हजार रुपयांची औषधे केमिस्टला परत न करता एका कॅन्सर पेशंटला वापरण्यासाठी एका हॉस्पिटलमधील डॉक्टरना दिली. हे गरिबाला दिलेले दान हे श्राद्धच नव्हे का? शास्त्रात सांगितलेला विधी सोडून केलेला हा विधी यश देणार नाही असे थोडेच आहे. परमगती नाही तरी सद्गती मात्र या विधीने मला निश्चित मिळेल अशी माझी श्रद्धा आहे असे डॉ. वर्तक म्हणतात. आपणास कळत नसेल तिथे शास्त्रविधी जरूर करावे पण निश्चितपणे कळत असेल तर वेगळे विधी करून हेतू साध्य करणे हीच सिद्धी आहे यश आहे. त्यामुळेच सुखही मिळते व सद्गतीही मिळते.

गीता कृष्णाने रणांगणी सांगितली की नाही? ती अहिंसापर आहे की संन्यासपर ? पांडवांचे जन्म व्यभिचारापासून झालेले आहेत का? या लोकांच्या सर्व शंका कुशंकांची अगदी विज्ञाननिष्ठ उत्तरे डॉ. वर्तकांनी दिली आहेत. ते स्वत: डॉक्टर असल्यामुळे 'पार्थेजेनेसिस' या क्रियेमुळे फक्त स्त्रीबीजापासून उत्पत्ती कशी करता येते ते विज्ञानाने कसे सिद्ध केले आहे हे सांगून पांडवांचे जन्मरहस्य स्पष्ट करून सांगितले आहे.

कृष्णाने जे ज्ञान अर्जुनाला सांगितले ते संजयाने ऐकले आणि धृतराष्ट्र व व्यासांना सांगितले. धृतराष्ट्राने ते या कानाने ऐकून त्या कानाने सोडून दिले. व्यासांना त्याचे चिरंतन महत्त्व वाटले म्हणून त्यांनी ते महाभारतात लिहून ठेवले. त्यास शिष्य संजय व व्यास हे दोघे सत्यनिष्ठ त्यामुळे त्यांनी मनचे काही त्यात घुसडले नाही. पण कृष्णाच्या पारिभाषिक शब्दांची स्पष्टीकरणे सामान्यांसाठी म्हणून व्यासांनी जास्त दिली असणे अगदी संभवनीय आहे. बोललेले हे लिहिताना नेहमीच वृद्धिगत होते तसेच गीतेबाबत झाले असावे. वाचकांनी गीता सांगेपर्यंत योद्धे थांबले कसे? वगैरे शंका न काढता त्यातले ज्ञान ग्रहण करून आचरण करण्याचा प्रयत्न करावा असे लेखकाचे म्हणणे आहे. अध्यात्म्याच्या संशोधनासाठी 'अध्यात्म संशोधन मंदिर' व वेदांच्या संशोधनासाठी 'वेद विज्ञान मंडळ' त्यांनी स्थापन केले आहे. 'स्वयंभू' व 'वास्तव रामायण' हे त्यांचे दोन अभ्यासपूर्ण ग्रंथ खोट्या कल्पनांना म्हणूनच धक्का देणारे आहेत. त्यांची सत्य शोधण्याची धडपड, धडाडी, बुद्धी, कर्तृत्व अफाट आहे. अनुभूतीपूर्ण ग्रंथ म्हणूनच त्यांच्या 'उपनिषदांचे विज्ञाननिष्ठ निरूपण', 'पातंजलयोग विज्ञाननिष्ठ निरूपण' व 'गीता विज्ञाननिष्ठ निरूपण' या ग्रंथाकडे पाहिले जावे. सिद्ध पुरुषात गणना व्हावी एवढे महान कार्य त्यांनी केलेले आहे.

नोव्हेंबर ८६ पासून दर रविवारी वर्तकाश्रमात ते गीतेवर व्याख्यान देत, ८७पासून लेखन चालू केले नोव्हें. ९० ला प्रकाशित झालं. दिवंगत पत्नीचे वर्ष श्राद्ध हे पुस्तक तिला अर्पण करून नवीन पद्धतीने करावे असे डॉक्टरांच्या मनात होते. पण थोड्या कालावधीनंतर ते प्रकाशित झाले. सत्य व विज्ञान या दोन निकषांवर पडताळून मी गीतेची भोयतालची परिस्थिती पाहून तुलना केली ते भारतीयांचे डोळे उघडावे, हिंदू राष्ट्र चिरकाल मानाने जगावे, भौतिक व अध्यात्मिक पातळ्यांवर हिंदू सर्वश्रेष्ठ ठरावेत या हेतूने लेखन केलेय. यात राजकारण येणे अपरिहार्य आहे कारण गीता राजकारणासाठीच रणांगणावर सांगितली आहे. असे लेखकाने मनोगतात म्हटले आहे.

युद्ध चालू झाले तेंव्हा कार्तिक अमावस्या होती असे महाभारत वर वर पाहता वाचले तरी युद्ध चालू झाले त्याची

खरी तिथी मार्गशीर्ष अमावस्या होय ही तारीख ग्रहगणिताने मी निश्चित केली आहे ती १६ ऑक्टो. ५५६१ वर्षे (इ.स. पूर्वी) अशी आहे. त्या दिवशी रविवार होता. याच दिवशी गीता सांगितली गेली हा सर्व विषय 'स्वयंभू' या माझ्या ग्रंथाच्या तिसऱ्या आवृत्तीत सविस्तर दिला आहे असे 'गीता विज्ञाननिष्ठ निरूपण' या ग्रंथाच्या सुरुवातीला गीतेची पार्श्वभूमी सांगतांना लेखकाने स्पष्ट केले आहे. ५६६ पानांच्या या ग्रंथाच्या शेवटी दादा महाराजांचा आशीर्वाद व 'तरुणभारत-पुणे, २७ जून १९८२च्या अंकातील समीक्षकांचे अभिप्राय दिले आहेत. त्यावरून या ग्रंथाची व लेखकाची योग्यता व महती वाचकांना कळून येते. लेखकाचे विज्ञान ज्ञान अचंबित करणारे आहे. या ज्ञान गंगेत डुबकी मारून हाती येतील तेवढी ज्ञानरत्ने ओंजळीत घेण्याचा अलभ्य लाभ ज्याला हवा त्याने घ्यावा.

गीता विज्ञाननिष्ठ निरूपण
लेखक : डॉ. प. वि. वर्तक
वर्तक प्रकाशन, वर्तकाश्रम ४९७,
शनिवार पेठ, पुणे ३०
प्रथमावृत्ती : १८ नोव्हें. १९९०,
पृष्ठे ५६६, मुल्य : २४०रू.

- आशा भिडे
बी/१, विजय अपार्टमेंटस्,
'आराधना', टॉकीजजवळ,
ठाणे (प.) ४०० ६०२.
दूरध्वनी : २५४१ ०१४०

## वळणे व सवयी

- वस्तू घेतल्यावर ती परत तिच्या जागी ठेवावी.
- खाद्य वस्तू आपल्याला मिळाल्यावर ती इतरांनाही मिळाली आहे की नाही तेही पहावे.
- प्रथम इतरांना द्या, मग स्वत: घ्या.
- लहान सहान गोष्टींनी चिडू नका, संतापू नका.
- सतत शांत वृत्तीनं राहा व कामे करा.
- माणसाच्या जातीपेक्षा त्याच्यातील माणुसकीकडे पहा.
- पैसा हे साधन आहे, साध्य नाही, ह्याची जाणीव ठेवा.
- दुसऱ्याला भेटायला जाताना, भेटण्याच्या जागी स्वत: ठरवलेल्या वेळेपूर्वी किमान पाच मिनिटे तरी हजर राहा.
- सुखाचा शोध घेताना आपल्यापेक्षा खालच्या माणसाकडे पहावे व यशाचा शोध घेताना आपल्यापेक्षा वरच्या माणसाकडे पाहावे.
- कुठल्याही माणसाला दुखवू नका. आयुष्यात केव्हातरी त्या माणसापासून फायदा होण्याची शक्यता असते.

# 'तोवरि नूतन, गीतरामायण'

*'गीत रामायणा'ची मोहिनी अजूनही मराठी मनावर आहे. आधुनिक वाल्मिकी 'गदिमा' आणि बाबूजींचे संगीतस्वप्न हा मराठी काव्य संगीतातला मोठा महत्त्वपूर्ण आविष्कार आहे. हे वर्ष गीतरामायणाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष. त्या निमित्ताने हा विशेष लेख. - संपादक*

*''अजाणतेपणी केव्हा माता घाली बाळ गुटी*
*बीजधर्माच्या द्रुमाचे कणकण गेले पोटी*
*छंद जाणतेपणीचा, तीर्थ काव्याची धुंडिली*
*कोण्या एका भाग्यवेळी पूजा रामाची मांडली*
*देववाणीतले ओज शीतळले माझ्या ओठी*
*वाल्मिकीच्या भास्कराचे होई चांदणे मराठी*
*झंकारती कंठवीणा, येती चांदण्याला सूर*
*भावमाधुर्याला येई महाराष्ट्री महापूर.''*

मराठी साहित्य, संस्कृती, संगीत यांना अलौकीकत्व प्राप्त करून देणाऱ्या एका महाकाव्याची ही अक्षररूपी प्रस्तावना. कविश्रेष्ठ ग.दि.माडगूळकर आणि संगीतकार सुधीर फडके यांच्या अलौकीक प्रतिभेचा अविष्कार म्हणजेच महाकाव्य 'गीतरामायण'.

गीतरामायणाच्या निर्मितीचं हे सुवर्णमहोत्सवी वर्ष. आजपासून बरोबर पन्नास वर्षांपूर्वी नीत्यनवीन उपक्रमांसाठी नावाजलेल्या गेलेल्या पुणे आकाशवाणीनं एक नवीन कार्यक्रमाची घोषणा केली. 'गीतरामायण'.

पुणे आकाशवाणी केंद्राचे गोमांतकीय अधिकारी सीताकान्त लाड यांची ही संकल्पना. दर्जेदार आणि नवनवीन कल्पना असलेले सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून श्रोत्यांची अभिरूची घडवणारे एक सक्षम अधिकारी म्हणून त्यांची ख्याती होती. श्रीरामचरित्रावर गीतांच्या मालिकेची एक संकल्पना त्यांनी ग.दि.माडगूळकरांसमोर मांडली. माडगूळच्या पंचक्रोशीमध्ये 'पांडवप्रताप', 'हरीविजय' यांची पारायणे ऐकलेल्या लहानग्या माडगुळकरांना आपल्या हातून रामाचं गाणं करण्याची किमया व्हावी अशी उत्कट इच्छा होती. ती इच्छा प्रत्यक्ष साकार होणार होती. दर आठवड्याला एक अशा ५६ गीतांचे सादरीकरण आकाशवाणीवरून करण्याची योजना ठरली आणि 'सुगंधसे स्वर भुवनी झुलले' या न्यायानं गीतरामायणाच्या निर्मितीची नांदी झाली.

आणि अखेर तो सुवर्णक्षण उगवला. दि. १ एप्रिल १९५५ ला रामनवमीच्या मुहूर्तावर श्रीरामगीतांच्या गीतरामायणातले पहिले गीत सादर होऊ लागले -

*'स्वये श्री राम प्रभू ऐकती,*
*कुश-लव रामायण गाती'*

बाबूजी सुधीर फडक्यांचा सच्चा, शुद्ध स्वर, स्पष्ट शब्दोच्चार आणि शास्त्रीय संगीताची अलौकिक बैठक यामुळे गीतरामायणाच्या काव्याबरोबरच त्याचे श्राव्यही अप्रतिम झाले. गीतरामायणाने लोकप्रियतेचे सगळेच उच्चांक मोडले. सकाळी बरोबर साडेआठ वाजता रेडिओला हार घालून श्रोते गीतरामायणाचे पुढील गाणे ऐकावयास बसत असेही सांगितले.

ज्येष्ठ संगीतकार प्रभाकर जोग यांनी सुधीर फडक्यांबरोबर गीतरामायणासाठी संगीत संयोजनाचे कार्य

केले. दरवेळेस गदिमांकडून नवीन गीत आणण्याची जबाबदारी त्यांचीच होती. त्यामुळे ते घरी आले की कौतुकाने गदिमा 'आला रे रामाचा दूत आला' असे म्हणायचे. 'पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा' या गीताला जोगांनी केलेली व्हायोलीनची साथ तर केवळ संस्मरणीय.

भारतीय संस्कृती, समाज यांना आदर्शवत् वाटणाऱ्या मर्यादा पुरूषोत्तम श्रीरामचंद्रांची ही कथा. म्हणजेच चिरंतन अशा नीतिमूल्यांची भावभावनांवर झालेली ही मातच होय.

गीतरामायणाचे हिंदी, कानडी, तेलगु, कोकणी, आसामी, उडिया, सिंधी, बंगाली, इंग्रजी अशा नऊ भाषांत अनुवाद झाले. गीतरामायणाला लोकप्रियता तर अफाट लाभली.

बाबुजी सुधीर फडके यांचा गीतरामायणातील यशाचा सहभाग तर असामान्यच आहे. बाबुजी स्वत: 'राम'मय होऊन गीतरामायण गात. अर्थात बाबुजींचे मूळ नाव हे 'रामचंद्र'च. हाही एक विलक्षण योगायोगच. बाबुजींचे गीतरामायण प्रत्यक्ष ऐकताना अनेकांना भावनावेग आवरत नसे. मग 'पराधीन आहे जगती' ऐकताना अश्रूधारा न आवरणारे गोळवलकर गुरूजी असोत किंवा ज्यांच्यासाठी बाबुजींनी स्वत:चं अस्तित्वच नंतरच्या काळात पणाला लावलं ते साक्षात् स्वा. वि.दा. सावरकर असोत. हे गीतरामायणाच्या यशाचे हे सुवर्णक्षणच होते. दादरच्या राजा शिवाजी विद्यालयात एकदा गीतरामायणाचा कार्यक्रम होता. परंतु दुर्दैवाने त्यादिवशी बाबुजींची गाण्यांची वही हरवली होती. अशावेळी कार्यक्रमात खोळंबा होऊ नये म्हणून उपस्थितांपैकी काही रसिकांनी स्वहस्ताक्षरात ती चौदा गाणी लिहून बाबुजींनी दिली. अशी होती गीतरामायणाची लोकप्रियता.

गीतरामायणाच्या ग्रंथरुपी आवृत्तीच्या प्रस्तावनेमध्ये महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार लिहितात -

'महाराष्ट्रात एकनाथ, कृष्णदास मुद्गल, श्रीसमर्थ आदी संतकवींनी मराठी जनतेस रामायण चाखवले आहे. मोरोपंतांनी तर एकशे आठ रामायणे रचली. पांगारकरांनी छोटेसे 'कविरामायण' प्रसिद्ध केले. डॉ. मराठे यांचे ओवीबद्ध 'झोपाळ्यावरचे रामायण' उपलब्ध आहे. अशा रामकथेवर अलिकडे माणदेशाच्या मातीतून उदयास आलेले अस्सल मराठी बाण्याचे कवी श्री. ग.दि. माडगूळकर यांनी आपल्या गीतरामायणाचा कौस्तुभमणी महाराष्ट्र शारदेच्या कंठात बांधला आहे. माडगूळकर हे आधुनिक वाल्मिकी आहेत. गीतरामायणानंतर 'गीत कृष्णायन', 'गीत दासायन' अशी परंपरा या आधुनिक वाल्मिकीपासून सुरू झाली. म्हणूनच या परंपरेचे आदिकवी माडगूळकरच ठरतात. वाल्मिकींचे संस्कृत रामायण असो की माडगूळकरांचे गीत रामायण असो, माडगूळकरांच्याच शब्दात सांगावयाचे तर, अभिप्राय एकच - 'काव्य नव्हे हा अमृतसंचय'.

खरोखर गीतरामायण हा एक अमृतसंचयच होता. आज अर्धशतक उलटूनही जनमानसावर त्याची मोहिनी अद्यापही कायम आहे. अजूनही आकाशवाणीवरून गीतरामायणाचे वेळोवेळी प्रसारण केले जाते. गीतरामायण ही महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख बनली आहे. कदाचित गीतरामायण हा कलाविष्कार घडवताना 'या सम हाच' हा नियतीचाच उद्गार असावा.

'जोवरी हे जग, जोवरि भाषण
तोवरी नूतन, गीतरामायण'

- अमेय प्र. रानडे
सहाय्यक ग्रंथपाल,
मुलुंड वाणिज्य महाविद्यालय,
मुंबई

# दिशा संशोधनाच्या...

*बा.ना.बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात कनिष्ठ विभागात जीवशास्त्र शाखेत गेली २५ वर्षे सेवेत असलेल्या सौ. मंगला उदय बोरकर यांना पी. एच्. डी. ही पदवी प्रदान करण्यात आली. या प्रबंधाचे शिर्षक होते* "Ecological Studies of Mangraove ecosystem of Thane Creek." *या प्रबंधाचा व या पदवीसाठी केलेल्या कामाचा आढावा . - संपादक*

खाडीच्या किनारपट्टीवर दोन्ही किनाऱ्यावर ४ ठिकाणे निवडली होती. येथील पाण्याचे, मातीचे, प्राण्यांचे व वनस्पतींचे चार ऋतुंमधील नमुने आणून बांदोडकर महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागाच्या प्रयोग शाळेमध्ये अभ्यासले गेले. हा अभ्यास २००१-०२ या कालावधीत पूर्ण केला गेला. या सगळ्या कामाचे एकत्रीकरण, प्रबंध लेखन हे बा. ना. बांदोडकर महाविद्यालयाच्या प्राणि शास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. र. प्र. आठल्ये यांच्या अमूल्य मार्गदर्शनाखाली २००४च्या मार्च मध्ये पूर्ण झाले. त्यानंतर विद्यापीठाकडून Viva Vocae घेण्यात आली. व २४ ऑगस्ट २००४ रोजी पदवी प्रदान करण्यात आली.

**संशोधन तपशील**

ठाणे खाडीतील २६ कि. मी. लांबीचा पट्टा अभ्यासण्यात आला होता. या खाडीच्या उत्तरेकडे उल्हास नदी मिळते व दक्षिणेकडे अरबी समुद्र. साहजिकच एका बाजूला गोड्या पाण्याचा प्रभाव तर दुसऱ्या टोकाला खाऱ्या पाण्याचा. या क्षारतेतील बदलामुळे येथील जैविक विविधता आणि त्यांचे प्रमाण यावर परिणाम होतो.

ठाणे खाडीच्या बाजूला ठाणे, बेलापूर, मुंबई सारखी मोठ मोठे उद्योग धंदे असलेली शहरे वसली आहेत. येथील लोकसंख्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे. आणि दिवसेन् दिवस होत असलेल्या विस्तार या खाडीला गिळकृत करूं पहात आहे. खरे तर आपल्या विद्या प्रसारक मंडळाचा परिसर सुद्धा याला हातभारच लावत आहे. शिवाय उद्योग धंद्यामुळे कारखान्यांतून येणारा सर्व रासायनिक कचरा व घराघरातील घन कचरा हा खाडीच्या पाण्यात सोडल्याने या पाण्यात हानिकारक धातूंचे (toxic) प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले आहे.

या प्रबंधासाठी खाडीतील पाणी, माती, पाण्यातील व मातीतील प्राणी व येथे आढळणारी वनस्पती ही भरतीच्या वेळी गोळा केली गेली.

या पाण्यातील प्राणवायूचे प्रमाण अभ्यासले. प्राणवायूची गरज सर्व जीवांना असते. त्याच्या पाण्यातील प्रमाणावर तेथील जीवसृष्टीचा अंदाज लावता येतो; कारण २.५ मि.ग्रॅ./लि. पेक्षा कमी म्हणजे धोकादायक पातळी असे समजले जाते. आपल्या ठाणे खाडीत ही पातळी या धोकादायक रेषेच्या खालीच आहे.

त्याचबरोबर पाण्याच्या क्षारतेचा अभ्यास केला आणि त्याचा परिणाम जैवसृष्टीवर कसा होतो ते पडताळले. त्याचप्रमाणे पाण्यातील घनकण, फॉस्फेट, नायट्रेट, सिलिकेट यांचे प्रमाणही अभ्यासले. या शिवाय पाण्याचे pH, व पाण्याची पारदर्शकताही अभ्यासली.

येथील मातीचेही परीक्षण केले. मातीतील क्षारता अभ्यासली. त्याचप्रमाणे मातीतील उपलब्ध फॉसफोरस, टोटल फॉस्फोरस व टोटल नायट्रोजन यांचे प्रमाण अभ्यासले. या शिवाय मातीमध्ये वाळूचे व चिकण मातीचे प्रमाण शोधले. यामध्ये वाळूचे प्रमाण अगदी नगण्य असते.

याशिवाय या मातीच्या पाणी शोषून घेण्याच्या क्षमतेचा ही अभ्यास केला.

या सर्व अभ्यासातून पाण्यातील व मातीतील प्रदूषणेके जैवसृष्टीवर कसा परिणाम करतात ते पडताळता आले.

या व्यतिरिक्त पाण्यातील प्लवंगांचा (plankton) चा अभ्यास करण्यासाठी वेगळे पाणी घेतले. व त्यातून पाण्यातील फायटोप्लॅंकटंन व झूप्लाकटंन हे अभ्यासले. आधी पूर्ण केल्या गेलेल्या अभ्यसाशी तुलना केल्यास त्यातील विविधता व घनता कमी झाली आहे हे लक्षात येते, आणि प्रदूषणता तग धरू शकणाऱ्याच जाती आता जास्त प्रमाणात मिळत आहेत. या मातीत असलेल्या प्राण्यांचाही अभ्यास करण्यात आला. अतिसूक्ष्म प्राणी, सूक्ष्म प्राणी आणि त्याच्या पेक्षा मोठे असे सर्व प्राणी अभ्यासले. ते polychaetes, sea anemones crabs, molueses म्हणजे वेगवेगळ्या तऱ्हेचे शंखांतील प्राणी अभ्यासले. या अभ्यासातून असे आढळून आले की प्रदूषणात राहू शकणारेच प्राणी जास्त प्रमाणात दिसतात.

**वनस्पतींचा अभ्यास**

या पाणी व मातीच्या अभ्यासाबरोबरच येथील वनस्पतींचाही अभ्यास केला. इथे येणारी वनस्पती ही खास प्रकारची असते. ह्याला खारफुटी (Mangroves) असे म्हटले जाते. ही झाडे दलदलीच्या ठिकाणी, (मातीत पाण्याचे प्रमाण जास्त व भरती ओहोटीच्या पाण्याच्या पट्ट्यात येणारे) आणि पाण्यातील अधिक क्षारता असलेल्या ठिकाणीच वाढतात. यासाठी त्यांच्यामध्ये खास गुणधर्म आहेत. पाण्यातील क्षारतेचे प्रमाण कमी जास्त झाल्यास या झाडांवर काय परिणाम होतो याचा अभ्यास केला, असे लक्षात आले की या झाडांना क्षारता लागते पण ती अधिक झाल्यास त्यांची वाढ खुंटते. गोड्या पाण्यात ही झाडे वाढत नाहीत.

दलदलीची जागा असल्यामुळे या मुळांना श्वास घेण्यासाठी मातीच्या वर यावे लागते. (Pneumatophores) या मुळांमुळे लहान लहान खळगी तयार होतात. ही सुरक्षित जागा पाण्यातील प्राण्यांना आपली अंडी सुरक्षित ठेवण्यासाठी उपयोगी पडतात. खारफुटी वनात आढळणारी झाडे ही काही पूर्णपणे किनाऱ्यावरील दलदलीत असतात तर काही थोडीशी वरच्या बाजूला असतात. ठाणे खाडीत मिळणारी झाडे म्हणजे Auicennia Marina, Avicennia officinals, Sonneretia apetala, Salvadora persica, Excoecaria agallocha Sesuuim portulacastrum, Aegiceras cornicelatum ही होत. बाहेरच्या बाजूला मिळणारी Derris trifoliata, Aleuropus lagopoides, Calotropis gigantea etc.

या झाडांचे फोटो, या झाडांतील गुणधर्म समजावून घेण्यासाठी त्याचे सूक्ष्मदर्शकातून काढलेले फोटो, हेही अभ्यासण्यासाठी उपयोगात आणले.

या प्रबंधात ज्या जड धातूचे प्रमाण विशेष अभ्यासले गेले ते म्हणजे पाण्यातील मातीतील, प्राण्यांतील व खारफुटीतील झाडांमध्ये असणारे जड धातू Pb, Fe, Cd, Cu, Zn याचे प्रमाण याचा अभ्यास केला. यामध्ये Pb आणि Zn याचे प्रमाण अधिक आढळले.

ही जी खारफुटी वनातील झाडे आहेत. त्यांचे अनेकविध उपयोग आहेत. ही झाडे पाण्यातील, मातीतील विषारी कण शोषून घेतात. ही झाडे पाणी आणि जमीन यांच्यामध्ये वाढतात. त्यामुळे ही झाडे समुद्राच्या तीव्र लाटांना थोपवून धरून किनारपट्टीचे संरक्षण करतात. त्सुनामी सारख्या मोठ्या लाटांमुळे होणारी हानी या मॅंग्रूव्हच्या वनामुळे टाळता आली असती. या मॅंग्रूव्हसना buffer zone असे म्हटले आहे. परंतु दुर्दैवाने हे महत्त्वाचे फायदे लक्षात न घेता ठिकठिकाणचे Mangroves हे वेगवेगळ्या कारणासाठी वसाहती उभारण्यासाठी, गोल्फ कोर्स बनविण्यासाठी अशा मनोरंजनाच्या कामाकरिता

तोडले जाऊन नष्ट केले जात आहे.

याचा आणि एक सरस उपयोग म्हणजे हवेतील कार्बन डाय ऑक्साईडचे प्रमाण कमी करणे. या पृथ्वीतलावर $Co_2$ चे प्रमाण वाढत आहे आणि यामुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे आणि यामुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. (global warming) ही झाडे त्याच्या पानामुळासकट $Co_2$ शोषून घेऊन अन्न तयार करतात. त्यामुळे $Co_2$ चे प्रमाण कमी होण्यास मदत होते.

तात्पर्य हे की ही खाडीतील ecosystem आपल्या ठाणे शहराला लाभल्यामुळे आपण भाग्यवान आहोत. या ecosystem चा आपण सांभाळ केला पाहिजे, ती वाढीस लावली पाहिजे.

- डॉ. मंगल बोरकर

बी.एन्. बांदोडकर कॉलेज ऑफ सायन्स

ठाणे.

भारत महासत्ता बनण्याच्या दृष्टीने

मित्रहो,

दिशासाठी वरील आणि वरीलप्रमाणे विषयांवर 'विचार देणारे' लेख हवे आहेत. नेहमीप्रमाणे विनंती आपण विचारवंत आहात, तेव्हा आपण लिहायला हवं !

लेखासाठी अन्य काही विषय हवे असतील, संदर्भ हवे असतील तर मला अवश्य भेटा !

- संपादक

## परिसर वार्ता

### सहवेदना

विद्या प्रसारक मंडळाचे माजी कार्याध्यक्ष अ.धों. टिल्लू यांचे दीर्घ आजाराने २६ फेब्रुवारी २००५ रोजी पहाटे निधन झाले. ते ६६ वर्षांचे होते.



१९७६ पासून विद्या प्रसारक मंडळाशी संबंधित असणारे अ.धों. टिल्लू १९८८ ते ९८ या कालखंडात मंडळाचे कार्यवाह तर १९९८ ते २००१ या कालावधीत कार्याध्यक्ष होते. विद्या प्रसारक मंडळाचा इतिहास संकलित करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. व्ही.पी.एम्. दिशा, भावे राष्ट्रीय व्याख्यानमाला या उपक्रमांसाठी त्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. व्ही.पी.एम्. दिशाचे ते काही काळ संपादक होते.

वाचन, अध्यापन, लेखन, चिंतन हे त्यांचे छंद होते. सकारात्मक दृष्टीने काम करणाऱ्या कै. टिल्लू सरांचे पहिले प्रेम विद्या प्रसारक मंडळ हेच होते. स्मृति पत्रे, झपूर्झा या ग्रंथांचे त्यांनी प्रकाशन केले तर 'ईश्वराचे देणे' हे त्यांचे पुस्तक प्रकाशनाच्या मार्गावर आहे. केंद्र शासनाच्या नोकरीतून राजपत्रित अधिकारी म्हणून ते १९९६ साली निवृत्त झाले होते.

'दिशा' नियतकालिकातर्फे त्यांना विनम्र श्रद्धांजली.

# निंदकाचे घर...

*SWOT हे व्यवस्थापनातील एक महत्वपूर्ण तंत्र. त्यातील स्वत:चे दोष व त्याबद्दलच्या जाणीवा याबद्दल हा लेख.*
*- संपादक*

तंत्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमातील Generic Skills नावाच्या नव्याने सुरू झालेला विषय अभ्यासताना मला वेगळाच जाणवणारा भाग म्हणजे SWOT. Swot Anlysis की ज्यामध्ये स्वत:चे गुण (Strength) अवगुण (Weakness) ओळखून व त्यांना अनुकूल असणाऱ्या गोष्टींचा मेळ साधून व्यक्तिमत्त्व विकास साधायचा, अशा काहीशा स्वरुपाचे मांडलेले आहे. या Swot Analysis मध्ये व्यक्तीला स्वत:चे चांगले गुण (असलेले व नसलेलेही) मोठ्या यादीने उत्तमरित्या मांडता येतात, पण तेच अवगुणांच्या बाबतीत म्हटलं तर ही यादी अगदी सशाच्या शेपटीसारखी लहान होते. माणसाचा स्वभावच मुळी स्वत:चे लाड, कौतुक करून व करवून घेण्याचा आहे. त्यासाठीच मिळणारी स्तुती जी त्याला शेफारून ठेवत असली तरी प्रिय असते. पण त्याच जागी इवलासा दुर्गुणही तो ऐकायच्या परिस्थितीत तो नसतो, जो दूर करण्याची त्याला खरच गरज असते आणि म्हणूनच सामान्यत: व्यक्ती आपल्या चांगल्या गुणांना कुरवाळताना आणि दुर्गुणांना लपवताना दिसते.

तसे पाहता अनेकांना त्यांची स्तुती करणारी, त्यांच्याशी चांगले बोलणारी माणसे अधिक प्रिय असतात आणि त्यांचा सहवास अधिक असावा अशी अपेक्षा असते आणि निंदकाचा (निंदा करणाऱ्याचा) अधिक तिटकारा असतो पण प्रत्यक्षात निंदा करणारा आपले Swot Analysis चे काम अधिक सोपे करतो. त्याचा पुष्कळसा वेळ चांगल्यात वाईट काय आहे हे शोधण्यात जातो आणि तो तांदूळातून खडे काढावेत तसे योग्यरित्या गुणांतील दुर्गुण शोधून निंदा करत बसतो, जे व्यक्तीला स्वत: शक्य नसते. निंदकाच्या या निंदा करण्याच्या स्वभावाला चांगल्या दृष्टीकोनातून (with Positive attitute) पाहिले तर लक्षात येईल की जे दुर्गुण स्वत:कडून दुर्लक्षित केले जातात आणि यशाच्या मार्गातील अडथळे ठरू शकतात, ते निंदा करणारामुळे प्रकाशझोतात येतात आणि हे अवगुण दूर करण्यासाठी असलेल्या ज्ञानात, चांगल्या गुणात सुधारणा करून ते अधिकाधिक उजळ करण्याचा प्रयत्न करतो. म्हणूनच अनेकशा संस्थांमध्ये Suggestion box ची सुविधा असते. याबाबत स्पष्ट करणारी एक गोष्ट अशी,

सोमदत्त नावाचा एक शिल्पकार जेव्हा जेव्हा एखादे सुंदर शिल्प बनवून त्याच्या वडिलांना दाखवत असे तेव्हा प्रत्येक वेळेस त्याचे वडील त्यात काहीना काही दोष दाखवत शिल्परचनेतील दोष दूर करण्यासाठी सोमदत्त नेहमी प्रयत्न करी आणि दोषरहित शिल्पाकृती वडिलांना दाखवीत असे. तरी सुद्धा वडिलांना त्याला शाबासक कधीच मिळत नसे. म्हणून एकदा जेव्हा त्याचे वडिल परगावी गेले तेव्हा त्याने एक उत्तम असे शिल्प तयार केले व वडिल परतल्यावर ते मित्राने बनवलेले शिल्प असे सांगून वडिलांना दाखवले, तेव्हा वडिलांनी त्याची फार स्तुती केली व ते शिल्प परिपूर्ण असल्याचे सोमदत्ताला सांगितले. त्यावेळी सोमदत्ताने ते शिल्प स्वत: बनवलेले असल्याचे सांगून वडिलांना विचारले, 'जेव्हा जेव्हा मी शिल्प तयार केले तेव्हा आपण त्यात दोष दाखवले व आज म तयार केलेले शिल्प मित्राची निर्मिती म्हणून दाखवले तर त्याला स्तुती मिळाली, असे का?''

तेव्हा वडिलांनी उत्तर दिले, ''बाळा, प्रशंसेने

व्यक्तीला मी परिपूर्ण आहे असा समज होतो आणि म्हणूनच तो आपल्या कलेमध्ये, ज्ञानामध्ये पूर्णता मिळवण्यासाठी कधीच प्रयत्न करीत नाही. मी तुझे दोष दाखवले ज्यामुळे दोषरहित कलाकृती निर्माण करण्यासाठी तू प्रयत्न केलेस आणि त्या अविरत प्रयत्नांनीच तू या कलेमध्ये नैपुण्य मिळवले.''

या गोष्टीप्रमाणेच जीवनात यशस्वी होताना, एखादे ध्येय मिळविताना, अडथळा आणणारे दुर्गुण ओळखून त्यावर मात करण्यासाठी संत तुकारामांनी अतिशय संक्षिप्त ओवीत अधिक अर्थ व्यक्त करणारा कानमंत्र सांगितला आहे.

*''निंदकाचे घर असावे शेजारी ।''*

निंदा करणाऱ्याशी नेहमी जवळीक असावी, जरी त्यांच्या निंदा त्रासदायक असल्या तरीही हे निंदक म्हणजे नेहमीच आपला शत्रू, शेजारी वा सहकारीच असतो असं नाही. तर हा निंदक वाईट परिस्थितीच्या रूपातून सुद्धा आपली ताकद पाहतो. तर कधी अनुभवाच्या रूपाने आपल्यातल्या अज्ञानाला चिडवतो. हा निंदक कधी शिक्षेच्या रूपाने, समाजात आपलं हसं करतो, तर कधी मित्र निंदेच्या स्वरूपात मार्गदर्शन करतो. आणि खरोखर जर ही निंदा योग्य दृष्टीने हाताळली तर ती एखाद्या मार्गदर्शकासारखीच उपयोगी पडते फक्त मनाची निंदा सहन करण्याची तयारी हवी.

मुक्ताईनी तर म्हटलेच आहे -

*''संत जेणे व्हावे । तेणे जग बोले सोसावे ॥''*

चांगले काम करायचे म्हटले की, त्याला विरोध, निंदा या ओघानेच आल्या. पण त्यातल्या निंदेमधील योग्य आणि महत्त्वाचे म्हणजे सत्य असेल तर तेवढेच लक्षात घ्यावे नाहीतर म्हण आहेच ना !

*''एकावे जनाचे, करावे मनाचे''*

कापणाऱ्या विळ्याच्या धारेलाही ऊस आपला गोडवा देऊन जातो, तोडणाऱ्या कुऱ्हाडीलाही हातात धरण्यासाठी दांडा झाडाकडूनच मिळालेला असतो. सपकार करणाऱ्यांशी वागताना सुद्धा चांगले वागणे यासारख्या वस्तू सोडत नसतील मग माणसाने का सोडावे.

गाढवाचा गुणधर्म काय, तर लाथा मारणे. त्याने जर लाथ मारली तर त्याच्या लाथेचे प्रत्युत्तर लाथेनेच देणे योग्य नाही. तसेच निंदा करणे हा निंदकाचा गुणधर्म. त्याच्या निंदेला उत्तर म्हणजे आपण चांगली कामगिरी करून त्याच्याकडून स्तुती मिळवणे हेच. आणि ते मिळविण्यासाठी, ध्येयाप्रती सचोटी आणि प्रयत्न तर हवेच. निंदकाच्या निंदा आपल्या पाठीशी आहेतच.

*अत: नमो निंदकाय ।*

कु. रविंद्र शिवलिंग तोडकर

माजी विद्यार्थी (ई.पी.एस्.)

विद्या प्रसारक मडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे

## जागतिक ग्रंथ दिन

२३ एप्रिल हा जागतिक ग्रंथदिन. ग्रंथप्रेमी असाल तर या दिवशी एखादा तरी ग्रंथ वाचा, एखादा तरी ग्रंथ देणगी म्हणून ग्रंथालयाला द्या. यामुळे आपली वाचन संस्कृती टिकू शकते, वाढू शकते.

– संपादक

# शिर्डी देवस्थान पदयात्रा अेक अनुभव - वेगळ्या दृष्टिकोनातून

*मुंबई ठाण्यासारख्या शहरात राहून मराठी समाज कसा कळणार ? तसा कळायला हवा असेल तर त्या समाजाशी नात जोडायला हवी. अशा एका प्रयत्नाची जाणीव गाथा- संपादक*

"अेक तरी ओवी अनुभवावी" असे माऊलीच्या ज्ञानेश्वरीबद्दल भाविक मंडळी बोलतात. या संत वचनाप्रमाणे आयुष्यात किमान अेकदा तरी पंढरीची वारी करावी आणि तो सर्व आनंद व अभूतपूर्व सोहळा अनुभवावा तद्वतच मी म्हणेन श्री साईनाथांसारख्या अलौकिक सत्-पुरुषाच्या पदस्पर्शाने आणि वास्तव्याने पवित्र झालेली श्री शिर्डी देवस्थानची वारी देखील भाविकांनी अनुभवावी, आपल्याला अेक वेगळाच आनंद आणि मानसिक समाधान मिळते याची प्रचिती आली.



काही महिन्यांपूर्वी श्री क्षेत्र आळंदी ते पंढरपूर ही सुमारे २३५ किलोमीटर अंतराची पदयात्रा केवळ आठ दिवसांचे कालावधीत संपन्न करण्याचा अनुभव ठाण्यांतील अेक माऊली भक्त श्री जयंत दांडेकर यांचे दिंडी सोहळ्यानिमित्त मी घेतला ! त्याचवेळी आपण ठाणे ते शिर्डी ही पदयात्रा देखील करावी असं मनाशी ठरवलं होतं आणि तो योग नुकताच जुळून आला खरोखरच स्वत:ला मी भाग्यवान समजतो.

ही पदयात्रा करण्यामागे श्रद्धा व सबुरी याचा संदेश साऱ्या जगताला देणाऱ्या त्या महापुरुषाचे श्री साईनाथांचे दर्शनाचा आनंद घ्यावा हा हेतु तर निश्चितच होता परंतु त्याच बरोबर २५० किलोमीटरचे अंतर पायी पार करून आपल्यातील आत्मविश्वास आणि आपली शारीरिक व मानसिक क्षमता किती आहे याचीही प्रचिती घ्यावी असाही होता. काही मित्रांनी कशाला हा उपद्व्याप करतोस? पायावर अवाजवी ताण कशाला देतोस, शरीराचे हाल करून प्रकृती, निसर्गाच्या विरूद्ध कशाला जातोस? अशा तऱ्हेचा सल्ला मित्रत्वाच्या नात्याने मला दिला. परंतु निश्चयापासून मी परावृत्त झालो नाही. जाण्याचं निश्चित केलं.

पदयात्रा करण्यामागे माझा आणखी एक अतिशय महत्त्वाचा आणि वेगळा हेतू होता आणि तो म्हणजे ज्या मार्गाने आपण मार्गक्रमणा करीत आहोत त्या परिसरांतील सामाजिक, आर्थिक, भौगोलिक, औद्योगिक आणि अैतिहासिक परिस्थिती काय आहे याचा काही प्रमाणात का होईना अनुभव घ्यावा आणि तसा मी घेतलाही. किंबहुना भगवंताच्या नामस्मरणाबरोबरच भाविकांनी तो जरूर घ्यावा अशी विनंती व अपेक्षा आहे.

*हिरवे हिरवे गार गालीचे । तृणांकुराचे अन् मखमलीचे ॥*

या आणि अशा निर्झरा सारख्या अनेक कविता लिहिणारे श्रेष्ठ निसर्ग कवी -बालकवी-आपल्या अलौकिक काव्य प्रतिभेतून निसर्गाचं हुबेहुब चित्र आपल्यासमोर उभे करीत असत त्याचा प्रत्यक्ष अनुभव वारीत घेतला.

सूर्योदय, सूर्यास्त त्यावेळी आकाशात पसरलेल्या त्याच्या पिवळ्या तांबूस किरणांच्या छटा, ज्वारी, बाजरी, गहू इत्यादी पिकांची हिरवीगार शेतं, उसाचे मळे, टोमॅटो,

मिरची, कोथिंबीर, अन्य भाजीपाला इत्यादींनी बहरलेली शेतं, पक्षांचा किलबिलाट, डेरेदार वृक्ष, वाटेत लागलेल्या नद्या, नाले, विहिरी, शेतांतील पाण्याच्या पंपावर उसळणाऱ्या पाण्यावर, तलावावर, आंघोळीचा आनंदही घेतला. त्याच बरोबर शुष्क, रेताड जमीन, माळरान किती आणि केवढं सांगू तेवढे अपुरेच आहे. वाटेत नद्या, धरणं, जलाशये कोणती आहेत इत्यादींचा आपण पुस्तकात अभ्यास केलेला असतो. परंतु त्याचा अनुभव घेतला. आपल्याला कल्पना नाही परंतु साऱ्या महाराष्ट्रात रस्ते आणि रेल्वेचे जाळे इतके पसरलेले आहे की घरी बसून त्याचा अंदाज येत नाही. या वारीतील सहप्रवासी सांगत होते गतवर्षी हाच रस्ता इतका खराब होता की पदयात्रींना चालणं कठीण जात होतं परंतु शासनाने एका वर्षात बरीच प्रगती केली आहे. वाटेत औद्योगिक वसाहती, छोटे - मोठे कारखाने, कुक्कुटपालन केंद्र, डोंगर, किल्ले काय आणि किती सांगू? निसर्गाच्या उधळणी पुढे आपण नतमस्तक होता. या सर्व गोष्टींचा अनुभव जवळून घेण्याचा आनंद व मानसिक समाधान आणि शांती मला पदयात्रेमुळे मिळाली. परंतु या सर्वांमुळे मला विशेषत्वाने जाणवली ती खेड्यांतील लोकांच्या आदरातिथ्याची, आपुलकीची आणि माणुसकीची व प्रेमाची भावना. कोण, कुठले आम्ही? पण वाटेत विसाव्यासाठी घराची जागा पदयात्रींना देत होते, चहापाणी घेता का? न्याहारी करता का? अशी विचारणाही करीत होते. अशावेळी मला संकोचल्या सारखं होत असे आणि शहरी जीवनाशी मी नकळत तुलना करू लागत होतो.

आजची तरुण पिढी बिघडत चालली आहे तिची आध्यात्मिक, सात्विक प्रवृत्ती नाहीशी होत आहे, ती अधिक आक्रमक, आक्रस्ताळीय बनत चालली आहे. सुसंस्कारापासून दूर जाते आहे अशासारखी ओरड आपल्या सतत कानावर येत असते परंतु या वृत्तीला छेद देणारा अनुभव या पदयात्रेत मी घेतला. भांडुप येथील श्री साईनाथ



पदयात्रेतील एक छायाचित्रांकित क्षण

सांस्कृतिक मंडळ, आयोजित करीत असलेली 'भांडूप ते साई शिर्डी देवस्थान' ही २५० किलोमीटर अंतराची पदयात्रा सोहळा हा होय. वारीमध्ये ७०० हून अधिक पदयात्रींनी सहभाग घेतला होता. परंतु त्यातील ८५ ते ९० टक्के यात्री १५ ते ४० वयोगटातील होते. काही जणांची ही पहिलीच पदयात्रा होती. परंतु अनेक जण दुसऱ्यांदा, तिसऱ्यांदा किंबहुना काही भक्त मंडळी पालखीच्या प्रारंभापासूनच श्री साईनाथांच्या दर्शनाला जात आहेत. या ठिकाणी मला प्रकर्षाने जाणवते ती त्यांच्यामधील जिद्द, चिकाटी, कठोर परिश्रम करण्याची वृत्ती आणि मुख्य म्हणजे श्री साईनाथांवरील असलेली त्यांची श्रद्धा आणि भक्ती. अनेक पदयात्रींच्या पायाला फोड आले होते, तळव्याला लाल चट्टे पडले होते, पाय गुडघे वेदनेने दुखत होते, चालणं अतिशय कठीण जात होते, अनेक भाविक तर अनवाणी श्री साईंच्या दर्शनाला जात होते परंतु सांगावयास आनंद आणि समाधान वाटते की अपवादात्मक यात्रेकरू वगळता सर्व पदयात्रींनी गुरुवार दि. २३ ते गुरुवार दि. ३० डिसेंबर २००४ या आठ दिवसांचे कालावधीत काहीशी कठीण वाटणारी पदयात्रा प्रतिदिन ३२ ते ३५ किलोमीटर वेगाने पूर्ण केली.

श्री साईबाबा मंदिर भांडूप येथून सुरू झालेली पालखी प्रती शिर्डी साईबाबा मंदिर वर्तकनगर, ठाणे - काल्हेर -

पडघा - भिवंडी - शहापूर, खर्डी - कसारा - इगतपुरी - धामणी - कवडदरा - पांडुर्ली - सिन्नर - दातली - वावी - पोहेगाव सावळा विहीर ते क्षेत्र शिर्डी देवस्थान या मार्गाने मार्गस्थ झाली. प्रत्येक मुक्कामाचे ठिकाणी त्या जागेचे यजमान पालखीचे रांगोळ्या, हार, तुरे, पायघड्या आणि फटाके वाजवून अतिशय आनंदाने, आत्मियतेने व आदराने स्वागत करीत होते. मुक्कामाचे ठिकाणाहून निघताना आरती, मंत्रपुष्प, नैवेद्य, भजन झाल्याशिवाय पालखीचे प्रस्थान होत नसे. बरोबर दोन अबदागीर, राजदंड व भगवा झेंडा घेतलेले भक्तगण असत. पदयात्रीच्या प्रारंभी भगवा झेंडा घेतलेला मार्गदर्शक असे त्याचे पुढे कोणीही, कुठल्याही परिस्थितीत जावयाचे नाही असा दंडक होता. त्याचप्रमाणे वारीतील शेवटचा पदयात्री निघाल्यानंतर त्याच्यामागे भगवा झेंडा घेतलेला मार्गदर्शक होता. त्यामुळे कोणी पदयात्री मागे राहिलाय अथवा रस्ता चुकलाय असं कधीच झालं नाही. आठ दिवसांचे पदयात्रेत भक्त मंडळींना सकाळ संध्याकाळ चहा बिस्कीटे सकाळी भरपूर व चविष्ट नाश्ता, दुपारी व रात्री रूचकर भोजन आणि काहीतरी स्वीट असे. दमल्या भागल्या पदयात्रींना ठिकठिकाणी पाण्याची सोय, लिमलेटच्या गोळ्या यात्रेचे आयोजक स्वत: उभे राहून देत असत. अनेक मुक्कामाचे ठिकाणी गावातील प्रतिष्ठित, नगरसेवक, व्यापारी, ग्रामसेवक, पुढारी इत्यादी मंडळींनी 'साईभक्त' या भावनेने जेवण किंवा जेवणातील काही पदार्थ, स्वीट असे 'स्पॉन्सर' केले होते. खरोखरच वाखाणण्याजोगी आणि कौतुकाची गोष्ट होती. दोनशे पन्नास किलोमीटरचे अंतर साईभक्तांनी आलटून पालटून पालखी खांद्यावर घेऊन पार केले. या ठिकाणी एका गोष्टीचा उल्लेख आवर्जून करावा वाटतो की संपूर्ण पालखी वाहून नेण्याची जबाबदारी दोन तरूण व तडफेचे साईभक्त श्री सिंग व बावकर यांनी सांभाळली होती. रोज पालखी सकाळी सहा वाजता मार्गस्थ होत असे तर रात्रीच्या मुक्कामास येईपर्यंत नऊ-दहा वाजलेले असायचे त्यानंतर भोजन म्हणजे झोपेसाठी साडे अकरा बारा वाजलेले असायचे व अतिशय गाढ झोपलेल्या यात्रींना पहाटे चार वाजल्यापासून उठविण्याचे अतिशय कठीण व चीड येणारे काम 'दादा' नामक साईभक्त अत्यंत कौशल्याने आणि कोणीही दुखावणार अगर रागवणार नाही अशा पद्धतीने करीत असे.

मुंबई-ठाणे-नाशिक-नगर अशा महाराष्ट्रातील चार जिल्ह्यांतून पालखी मार्गस्त झाली. परंतु सावळा विहीर ते श्री क्षेत्र शिर्डी हे तीन ते चार किलोमीटरचे अंतर पार करण्यासाठी पदयात्रींना दोन तासाहून अधिक वेळ लागला. ढोल, ताशे, बँडच्या नादात पालखी मार्गस्थ होत होती. भक्त मंडळी 'ओम साई - जय साई' 'साईनाथ महाराज की जय' अशा नाम गजरांनी बेभान होऊन नाच होती. गुलाल, फुलांची उधळण होत होती. फटाक्याची आतषबाजी चालू होती. यात भर म्हणून की काय साडेसातशे भाविकांचे कुटुंबिय मंडळी भांडुप येथून आठ ते नऊ बस गाड्या घेऊन या जल्लोषात सामील झाली होती. साईभक्त एकमेकांच्या पाया पडत होते. आलिंगन देत होते. २५० किलोमीटरच्या खडतर प्रवासानंतर ('ज्यासाठी केला होता तो अट्टाहास तो दिन बरवा') श्रम साफल्याचा आणि इच्छापूर्तीचा आनंद घेत होते, तो वर्णनातील आहे. आत्मप्रचिती शिवाय तो इतरांना कळणार नाही. शांत, सोज्वळ, प्रसन्न आणि स्मितहास्य असणाऱ्या त्या संत महात्म्याच्या दर्शनाने भक्त मंडळी त्यांची सर्व दु:ख, वेदना विसरली आणि साईबाबांच्या चरणी लीन झाली.

सदरहू मंडळाचे अध्यक्ष श्री भाई सुर्वे, उपाध्यक्ष श्री. राणे, सेवा समिती सदस्य बावकर, सुर्वे, कदम इत्यादी कार्यकर्त्यांचे करावे तेवढे कौतुक थोडेच आहे. वेगवेगळ्या आचार-विचार, स्वभाव, जाती, धर्म, वयोगट असलेल्या भक्त मंडळींची एकत्र मोट बांधणं अेक आव्हान होतं परंतु त्यांनी यशस्वी आणि समर्थपणे ते पार पाडलं. खरोखरच

सर्व जण अभिनंदनास पात्र आहेत. सातशे पदयात्रींचे सामान दररोज काढून पुन्हा गाडीत ठेवणं, जेवण, नाश्ता, चहा इ. सर्वांना मिळेल अशा तऱ्हेने त्याचे वाटप करणं, पदयात्रींच्या औषध, पाणी इत्यादींची विचारपूस करणं ही सर्व कामे सेवासमितीचे कार्यकर्ते आपुलकीने, प्रेमाने आणि न चिडता करीत होते. त्यांच्या 'पेशन्सला' दादच दिली पाहिजे.

पदयात्रे निमित्त मंडळ आयोजित करीत असलेली आगळी-वेगळी व उल्लेखनीय आणि स्पृहणीय गोष्ट म्हणजे पूर्वी ज्याप्रमाणे सज्जनगडावरील उत्सवासाठी श्री समर्थ भक्त मंडळी भिक्षा मागून शिधा जमवीत असत. त्याचप्रमाणे या मंडळाचे कार्यकर्ते आजूबाजूच्या परिसरात फिरून तेथील साईभक्तांकडून डाळ, तांदूळ, साखर, तेल, रवा इत्यादी आठ दिवस पदयात्रींच्या भोजनासाठी व भंडाऱ्यासाठी लागणारा शिधा भिक्षा मागून आणतात आणि मुख्य म्हणजे तो पुरेसा जमतो. आठ दिवसांचे पदयात्रेत सहभाग घेतलेल्या भाविकांनी विडी, सिगारेट, पान, तंबाखू, दारू अशा व्यसनांपासून दूर रहावे, त्याचे सेवन करू नये असा प्रेमाचा दंडक असतो आणि सेवा समितीचे कार्यकर्ते पदयात्री तो नियम पाळीत आहेत किंवा नाही याबाबत सतत प्रयत्नशील असतात.

शेवटी ऐवढं म्हणायंस वाटतं की मनुष्य कितीही व्यक्ती व कुटुंबप्रिय असला तरी अशा पदयात्रेमुळे तो समाजप्रिय होतो. जनसमुदायाबरोबर राहण्याची, इतरांशी जुळवून घेण्याची, स्वावलंबनाची, सलोख्याची आणि दुसऱ्याला समजून घेण्याची वृत्ती वाढीस लागते. तो आत्मकेंद्रित न राहता समाजाभिमुख होतो. श्री साईनाथांनी अशी परोपकारी वृत्ती सर्वांना द्यावी अशी प्रार्थना करतो.

सुरेंद्र लागू,
चरई, ठाणे
फोन : २५३४ १३४१

**परिसर वार्ता**

## एप्रिल मधील विशेष कार्यक्रम

१४ एप्रिल ! आमच्या विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष व शिक्षण महर्षी कै. वा.ना. बेडेकर यांचा प्रथम स्मृतिदिन. कृतीशील अशा कै. वा.ना. बेडेकरांच्या या पहिल्या स्मृतिदिनानिमित्ताने आय.आय.टीतील कन्व्हल रेकी स्कूल ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे संचालक



डॉ. दीपक फाटक यांचे भारत संगणक भागीदार की सेवेकरी या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. हा कार्यक्रम थोरले बाजीराव पेशवे सभागृहात सकाळी १० ते १.३० या वेळात होईल.

नेत्रदान देहदान
आणि
धनदान
तेवढेच महत्त्वाचे
ग्रंथदान

# आत्म-विश्वास

आत्मविश्वास असणे ही एक आवश्यक बाब आहे. आत्म-विश्वास हा प्रत्येक कामाच्या बाबतीत लागू पडतो. व किती आत्म-विश्वासाने आपण कामे करतो. यावर आपले यशापयश अवलंबून असते. आपल्या समोर एखादे काम असेल व आपण जर आधीच गळून पडलो तर ते काम आपल्याला शक्य होणार नाही व आपण आपला आत्मविश्वास गमावून बसू. गमावलेला आत्मविश्वास आपल्या दुसऱ्या एखाद्या कामात आपल्याला सहाय्यभूत ठरणार नाही. व अपयशाची मालीकाच लागेल. व त्यामुळे आपल्या आत्मविश्वासाला एक खिंडार पडले व ही पोकळी भरून काढणे अधिक त्रासाचे होईल. म्हणून प्रत्येक काम हे आत्म-विश्वासाने करणे आवश्यक आहे. त्याकरिता आतापर्यंत ज्या बाबी आपल्याला सहाय्यभूत ठरल्या त्या सर्व बाबींची नीट मांडणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे आपला विश्वास वाढेल. व त्या विश्वासाच्या बळावर आपण पुढील कामे नेटाने करू शकू. म्हणून विश्वासाने विश्वास जसा वाढी लागतो. तसेच आत्म-विश्वासाने आत्मविश्वास वाढू लागतो. व त्यामुळे यशाची साखळी निर्माण होऊ शकते. प्रत्येक कामाच्या बाबतीत आपण समर्थपणे, आत्मविश्वासाने तोंड देता आले पाहिजे. प्रत्येक यशाचा मणी आपल्याला सुरेख ओवता आला पाहिजे. व ही यशाची माळ जसे आपण ईश्वराच्या नामावलीसाठी माळ ओढतो. त्या प्रमाणे ही यशाची माळ जर आपण सतत स्मरणात ठेवली तर त्याचा आत्मविश्वास वाढायला नक्कीच उपयोग होऊ शकतो. आत्म-विश्वासाने प्रत्येक काम हातात घेता आले पाहिजे. व त्यासाठी लागणारे बळ किंवा आत्मबल आपण आपल्याला अंगीकृत करुन घेता आले पाहिजे. सामर्थ्याला अनेक बाबी असतात. अनेक कप्पे, कोनाडे असतात त्या सर्व बाबी आपणाला लक्षात घेता आले पाहिजेत. सामर्थ्य हे मनात असते, मन घडवणाऱ्या विचारात असते व विचार चालवणाऱ्या आपल्या संस्कृतीत असते. आपण नाहीतर नुसते जगत असतो. असेच जगण्यापेक्षा आपण जर अधिक आत्मविश्वासाने जगलो तर त्यात आपले भलेच दडलेले आहे. म्हणून आपल्या भल्याकरिता आपल्यात आत्मविश्वास असणे आवश्यक आहे. आत्मविश्वास वाढवायचा असेल तर प्रत्येक काम वेळच्यावेळेवर करणे, चांगल्या सवयी लावून घेणे, प्रत्येक काम मनापासून करणे ह्या व अशा अनेक बाबी आहेत की त्यातून आपला आत्मविश्वास द्विगुणीत होईल. त्याच बरोबर आपले अधःपतन होईल असे अनेक गोष्टी दूर करायला शिकले पाहिजे. अर्थात अति-आत्मविश्वास ही असता कामा नये. कारण म्हण माहित आहे ना - अति तेथे माती. म्हणून आपल्या आत्मविश्वासावर आपले नियंत्रण असले पाहिजे.

प्रसन्न गोविंद कुलकर्णी

५, हेमकुंज, झवेर मार्ग,

मुलुंड (प.) मुंबई ४०० ०८०.

फोन नं. २५६१२३८८

# परिसर वार्ता

## भावे राष्ट्रीय व्याख्यानमालेत प्रा. प्रवीण दवणे

पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण आज सर्वांच्याच घरात होत आहे. घरातील व्यक्तींचे राहणीमान, बोलीभाषा ही बदलत असल्यामुळे मराठी भाषा ही घरातूनच हद्दपार झाली असल्याचे परखड मत प्रा. प्रवीण दवणे यांनी येथे व्यक्त केले.




भावे व्याख्यानमालेत प्रा. प्रवीण दवणे यांचे स्वागत करताना अध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर

बेडेकर विद्यालयात आयोजित केलेल्या पु.भा. भावे राष्ट्रीय व्याख्यानमालेतील 'सावर रे' या कार्यक्रमात ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, घरातील मुले ही पाश्चात्त्य संस्कृती आणण्याचा प्रयत्न करीत असून मराठीही घरातूनच हरवत चालली असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

या वेळी 'सावर रे' या विषयी ते म्हणाले, 'समाजात अशी काही माणसे आहेत की, ज्यांना अनेक समस्या आहेत परंतु तरीसुद्धा ती माणसे आनंदाने जगतात तसेच काही अशी माणसे आहेत की, ज्यांना समस्या नाहीत अशी माणसे चेहऱ्यावर प्रश्नच घेऊन फिरत असतात, अशी अनेक माणसे मला भेटली आणि त्यातूनच 'सावर रे'ची निर्मिती झाली.

आज सुखवस्तू हा शब्द उच्चारताना घरातील वस्तू या सुखीच असतात, परंतु माणसे दुःखी असतात. आज प्रत्येकाला आपापल्या 'पॉलिसी' मॅच्युअर कधी होतायेत याची बरोबर आठवण होते हे सांगून ते म्हणाले, 'फक्त पॉलिसीच मॅच्युअर होतायेत माणसे नाही.'

आज आपण एकमेकांसमोर मन मोकळेच करीत नाही. ई-मेल, एसएमएस यामुळे माणसामाणसातील संवाद हरवत चालला आहे, त्यामुळे माणसाला गप्पांच्या 'कौन्सिलिंग'ची गरज भासते. आज घरातील वाचन हरविले असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. संवादक मकरंद जोशी होते. दोन तास सुरू असलेल्या या गप्पांना ठाणेकरांनी चांगलीच गर्दी केली होती. आभारप्रदर्शन मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय वा. बेडेकर यांनी केले.

## सौ. आनंदीबाई केशव जोशी स्कूल

ओरिएंटल स्टडी सेंटर तर्फे निरनिराळ्या देशातील शिक्षकांच्या भेटीचा कार्यक्रम आयोजित केला जातो. त्या अंतर्गत दि. १४ फेब्रुवारी २००५ रोजी आमच्या शाळेत ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी, लंडन येथून १५ शिक्षक आले होते. स्वागत समारंभ झाल्यावर शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कोल्हटकर यांनी ओव्हरहेड प्रोजेक्टरच्या मदतीने शाळेची सर्व माहिती सादर केली. 'खाऱ्या पाण्याचा शेतीसाठी उपयोग ' हा राष्ट्रीय पातळीवर निवड झालेला शाळेचा विज्ञान प्रकल्प. गटप्रमुख सोनिया कारापूरकर (इ. ९वी) हिने तो प्रकल्प पाहुण्यांसमोर सादर केला. त्यांना तो अतिशय आवडला. त्या संदर्भात त्यांनी अनेक प्रश्न विचारले. प्राथमिक विभागाच्या शिक्षिका सौ. रश्मी शर्मा यांनी विज्ञानाचा एक पाठ सादर करून दाखवला.

डॉ. बेडेकर विद्यामंदिरच्या शिक्षिका सुनिता देशपांडे यांनी त्यांच्या शाळेची माहिती सांगितली. त्यानंतर शाळेत

भरवण्यात आलेल्या हस्तकला, चित्रकला व विज्ञान प्रदर्शनांना त्यांनी भेटी दिल्या. इ. ५वी ते ९वी विद्यार्थ्यांना तयार केलेल्या अनेक सुंदर वस्तू व काढलेली चित्रे प्रदर्शनात मांडण्यात आली होती. शाळेच्या शिक्षिका सौ. अर्पणा भोळे यांनी कै. डॉ. वा. ना. बेडेकर यांची काढलेली रांगोळी ही प्रदर्शनात उठून दिसत होती. प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांनी विज्ञानाचे प्रयोग स्पष्टीकरणासह दाखवले. पाहुण्या शिक्षकांनी प्रत्येक वर्गात फिरूनही अनेक गोष्टींची माहिती करून घेतली. शाळेत ह्याच वर्षी सुरु झालेली गणित व भूगोल प्रयोगशाळा बघून तर खुपच प्रभावित झाले. आमच्या शाळेतून त्यांना अनेक नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

### इ. १०वी निरोप समारंभ

इ. १०वी च्या मुलांसाठी असलेला निरोप समारंभ हा शालेय जीवनातील एक महत्त्वाचा कार्यक्रम. वर्षोनुवर्षे निरोप समारंभ सर्वच ठिकाणी एका ठराविक पदध्तीने साजरा केला जातो. म्हणूनच त्यात काहीतरी बदल करावा असे मॅडम सौ. कालिंदी कोल्हटकर यांच्या मनात आले.

आज सगळीकडेच असुरक्षितता आणि अनिश्चिततेचे वातावरण आहे. त्यामुळेच सुशिक्षित समाजातही बुवा बापूंचे प्रस्थ वाढले आहे. शाळेच्या छोट्या सुरक्षित जगातून मोठ्या जगात जाताना विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार करावा अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्या वंदना शिंदे यांचा कार्यक्रम ठेवला होता. नेहमी प्रमाणे सुरेल गीताने कार्यक्रमाची सुरवात झाली. त्यानंतर शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कोल्हटकर मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर दोन शब्द सांगितले आणि बोर्डपरीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. त्यानंतर सौ. शिंद्रे यांनी खिळ्यांवर झोपणे, जळता कापूर तोंडात धरणे ह्या सारखे अनेक प्रयोग स्वतः करून दाखवले व मुलांकडूनही करून घेतले. विज्ञानाच्या व हातचलाखीच्या सहाय्याने ह्या सर्व गोष्टी करता येतात. त्यात कुठलाही चमत्कार नाही हे प्रत्यक्ष प्रयोगाद्वारे सिद्ध करून मुलांना पटवून दिले. इ. ९वीतील विद्यार्थीनी ऋचा अढिया हिने सूत्रसंचलन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांना पावभाजी व गुलाबजाम हा नाश्ता देण्यात आला आणि हा आगळा वेगळा निरोप समारंभ संपला.

### बुद्धिबळ स्पर्धा

मुंबई बुद्धिबळ संघटनेच्या विद्यमाने प्रकाश वझे क्रिडा प्रतिष्ठानने मुलुंड पूर्व येथील वझे महाविद्यालयात आयोजित केलेल्या सुशीला वझे बुद्धिबळ चषक आंतरशालेय सांघिक स्पर्धेत आमच्या शाळेला द्वितीय क्रमांक मिळाला. आमच्या शाळेला १२.५ गुण मिळाले. भाग घेणारे विद्यार्थी-

कु. सोहम कर्णिक

कु. आदित्य कुलकर्णी

कु. मिहीर वैद्य

### फेब्रुवारी महिन्यात मिळालेली पारितोषिक

दि. १४ आणि १५ फेब्रुवारी रोजी विज्ञानप्रदर्शन झाले. त्यात इयत्तावार निवड झालेले प्रयोग व ते सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे-

इ. ५वी - प्रयोग - Electric Buzzer

विद्यार्थी - सिध्दार्थ नायर, कुणाल चौधरी, सितांशु छेडा

इ. ६वी -Model of an elevator

विद्यार्थी - निहारीका मुंगळे, अदिती करंदीकर

इ. ७वी - Aiquid Layers

विद्यार्थी- अखिल नायर, अनिश काळे

इ. ८वी - Magic of Reflection

विद्यार्थी - निशाद गुप्ते, अभिषेक यादव, प्रतिक फुलसुंदर

इ. ९वी - Conservation of energy and joules heating

विद्यार्थी - संकेत भोगले, पेरीन शहा, क्षय दामले, तेजस्विनी बोटे, निमिशा चव्हाण, खुशबू बिस्ट

**२२/२३ डिसेंबर २००४ रोजी झालेल्या क्रीडा दिनाची पारितोषिके -**

चॅम्पियन विद्यार्थीनी - ओजस गोहाड - ७वी अ

चॅम्पियन विद्यार्थी - तनुज ढापरे - ८वी क

Best in Sports - इ. ८वी ते १०वी

विद्यार्थीनी - सिद्धी भोजने - इ. ९वी क

विद्यार्थी - आशिश मुळे - इ. ९वी अ

इ. ७वी ब तील विद्यार्थीनी शिवांगी अभ्यंकर हिला सेव्हन स्टार स्पोर्टर्स अॅकॅडमी आयोजित १०० मिटर धावण्याच्या शर्यतीत सुवर्णपदक मिळाले. तसेच त्याच शर्यतीत १४ वर्षाखालील मुलींच्या गटात तिला वैयक्तिक चॅम्पियनशिपही मिळाली.

**नृत्य स्पर्धा**

२७ फेब्रुवारी २००५ रोजी घंटाळी प्रबोधिनी तर्फे झालेल्या नृत्य स्पर्धेत आपल्या शाळेच्या इ. ९वी च्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'उषःकाल होता होता' ह्या नृत्यास उत्तेजनार्थ पारितोशिक मिळाले.

**डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षा**

होमीभाभा सायन्स सेंटर तर्फे आयोजित होमीभाभा बालवैज्ञानिक परीक्षेत आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी मिळवलेले सुयश

| | | |
|---|---|---|
| इ. ९वी | सुवर्ण पदक | - विविक्तेश आगवण |
| | रौप्य पदक | - श्री पटवर्धन |
| इ. ६वी | सुवर्ण पदक | -ऋचा ठकार |
| | रौप्य पदक | - अमला भागवत |

**बांदोडकर विज्ञान महाविद्यालय**

**प्राणी पुनरुत्पादन जीव तंत्रशास्त्रीय दृष्टिकोण**

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर यांनी अलिकडेच सावंतवाडी येथील पंचम खेमराज महाविद्यालयात झालेल्या 'प्राणी पुनरुत्पादन जीव तंत्रशास्त्रीय दृष्टिकोण' या विषयावरील राष्ट्रीय परिषदेत खुल्या अधिवेशनात 'ठाणे शहरातील तलावांमधील जैविक विविधता' या विषयावरील शोध निबंध सादर केला. या शोध निबंधातील ठाण्यातील आठ तलावांची गेल्या पाच वर्षातील माहिती समाविष्ट होती. या माहितीत प्रामुख्याने भौतिक रासायनिक विश्लेषणाच्या निकषांचा तसेच फायटोप्लँकटनस्, झूप्लँक्टनस् (प्लवंग), परोजीवी व सूक्ष्मजीवाणु यांचा अभ्यास होता. सावंतवाडी सारख्या ग्रामीण क्षेत्रात असूनही परिषदेस अंदाजे १३० अभ्यासक उपस्थित होते. ५ व ६ फेब्रुवारी २००५ रोजी झालेल्या या परिषदेत डॉ. पेजावर यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करणाऱ्या संपदा तडफळे यांनी रॉटीफर्सच्या वर्तन शास्त्रावरील संशोधननिबंध सादर केला.

**भातसा परिक्रमा विषयाबाबत पूनम सिंगवी यांचे आवाहन**

पुढील वर्ष हे 'भातसा परिक्रमा वर्ष' म्हणून साजरे करावे अशी विनंती हरियालीचे श्री. पूनम सिंगवी यांनी बांदोडकर महाविद्यालयातील पदवी विभागातील शिक्षकांशी बोलताना केली. अलीकडेच हरियालीतर्फे राबविण्यात आलेल्या भातसा परिक्रमा मोहिमेत महाविद्यालयातील वनस्पतिशास्त्राचे ज्येष्ठ प्रा. डॉ. मोझेस कोलेट (एन्.सी.सी. प्रमुख) व काही विद्यार्थी सहभागी झाले होते. या मोहीमेची सर्व माहिती श्री. सिंगवी यांनी यावेळी सादर केली.

पॉवर पॉइंट च्या आधारे सादर करण्यात आलेल्या या कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांच्या प्रास्ताविकाने झाली. गेली सात वर्षे हरियालीची महत्त्वपूर्ण कार्यात आपण व महाविद्यालयाचा कसा वाटा आहे याबद्दल सांगून डॉ. पेजावर यांनी बांधिलकी म्हणून अशा प्रकल्पांकडे प्राद्यापकांनी वळावयास हवे असे त्यांनी सांगितले.

### मत्स्य शेतीतील आधुनिक प्रवाह

'मत्स्य शेतीतील आधुनिक प्रवाह या विषयावर युजीसी प्रायोजित दोन दिवसीय कार्यशाळा अलीकडेच पनवेल येथील म. फुले कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात झाली. ९ व १० फेब्रुवारी रोजी झालेल्या या कार्यशाळेत ठाण्याच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी शेती व त्यातील मत्स्य शेती या विषयावर मार्गदर्शन केले. या परिषदेस आजूबाजूच्या गावातील शेतकरी तसेच महाविद्यालयांतील प्रतिनिधी प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तंत्रनिकेतन

### विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनात 'करिअर गायडन्स वर्कशॉप'

दि. २५ व २६ फेब्रुवारी २००५ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयएसटीइ स्टुडंट चॅप्टर आणि रोटरी क्लब ऑफ ठाणे नॉर्थ एंड यांच्या सहकार्याने दोन दिवसांचा एक 'करिअर गायडन्स वर्कशॉप' विद्यार्थ्यांसाठी तंत्रनिकेतनातर्फे आयोजित केला होता.

या वर्कशॉपचे उद्घाटन अच्युत गोडबोले, आय.टी. कन्सल्टंट यांच्या हस्ते झाले. उद्घाटनाच्या प्रसंगी




डावीकडून डॉ. शेखर सुराडकर, डॉ. रवी चंद्रन, डॉ. विजय बेडेकर - कार्याध्यक्ष, वि. प्र. मंडळ, श्री. एन. के. मारवा, प्राचार्य श्री. दि. कृ. नायक

त्यांनी विद्यार्थ्यांना जे मार्गदर्शन केले ते विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील आयुष्यात खूपच उपयोगी ठरेल असे होते. आयुष्य म्हणजे एक प्रयोगशाळा अथवा ग्रंथालय आहे असे समजावे. कुठलाही विषय असो त्याचा सखोल अभ्यास करावा, भोवतालच्या परिस्थितीची जाण विद्यार्थ्यांनी ठेवावी असेही त्यांनी आपल्या भाषणात सांगितले.

यावेळी रोटरी क्लबचे डॉ. शेखर सुराडकर, एन. के. मारवा हेही उपस्थित होते. प्राचार्य दि. कृ. नायक यांनी पाहुण्यांची स्वागत केले.

या वर्कशॉपमध्ये अनिरुद्ध जोशी (एमडी ऑरनेट केमिकल्स' यांनी 'साऊंड टेक्नॉलॉजी' या विषयावर विद्यार्थ्यांना सांगितले. तसेच डॉ. रविचंद्रन (एमडी झायडस बीवायके हेल्थ केअर सिस्टिम), सौ. निलम चंद्रा (सेंट्रल रेल्वे), व्ही. एस. भाकरे (मॅनेजमेंट कन्सल्टंट), मेजर ओ. पी. गुप्ता (करिअर इन डिफेन्स) तसेच शशी नायर (जेटकिंग) वायरलेस लॅन आणि करिअर इन बीपीओ कंपनीज् या विषयावर अशोक गर्ग (केआयओ टेक्नॉलॉजीस) यांची व्याख्याने झाली तसेच दि. २६ फेब्रुवारी रोजी करिअर इन आय टी. गिरीश दांडगे (टाटा

इन्फोटेक), करिअर प्लॅनिंग अरुण नलगुंदकर, डायरेक्टर सेकंड इअरली प्रवेश इंजिनिअरिंगसाठी डॉ. सौ. संगीता वैद्य-जोशी (ऑफिसर ऑन स्पेशल ड्युटी, डीटीई) यानंतर हाऊ टू सक्सिड इन युवर करिअर श्री. एन. के. मारवा (मॅनेजिंग डायरेक्टर, मॅग्ना सर्व्हिसेस) यांची व्याख्याने विद्यार्थ्यांसाठी विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातर्फे आयोजित केली होती. या वर्कशॉपचा या विद्यार्थ्यांना नक्कीच उपयोग होईल.

## डॉ. श्रीमती मुळगांवकर



इंडियन जनरल ऑफ अप्लाइड अँड प्युअर बॉयोलॉजीच्या २००५ सालातील पहिल्या अंकात बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. श्रीमती मेघा मुळगांवकर यांचे दोन निबंध प्रकाशित झाले आहेत.

पहिल्या निबंधाचे शीर्षक 'स्टडी ऑफ पोलिनिआ ऑफ सम कॉर्टिकलस ऑर्किडस् फ्रॉम महाराष्ट्र अंडर एस्.इ.एम्. ' असे आहे. दुसरा शोधनिबंध डॉ. मुळगांवकर यांनी या विभागाचे निवृत्त विभागप्रमुख डॉ. ग. त्रि. दाभाडे यांच्यासह तयार केला असून त्याचे शीर्षक 'सम ऑब्झर्व्हेशनस् ऑन द पोलिनिया ऑफ थ्री स्पीशीज् ऑफ द कॉर्टिकोलस् ऑर्किड ऑफ द जीनस एरिडस लोर (Aerides Lour) अंडर एस्. इ. एम्. '' असे आहे.

पाटणा येथील मेंडिलियन सोसायटी ऑफ इंडियन तर्फे डॉ. मुळगांवकर यांना ''फेलो ऑफ मेंडेलियन अॅकॅडेमी ऑफ सायन्सेस'' हा बहुमान अलीकडेच मिळाला. यां संस्थेचे कार्यवाह डॉ. आर्. एन्. त्रिवेदी यांनी डॉ. मुळगांवकर यांना लिहिलेल्या पत्रात त्यांच्या योगदानाचा सन्मानपूर्वक उल्लेख केला आहे. या संस्थेच्या संशोधन पत्रिकेत त्यांचे ४ शोध निबंध अलिकडेच प्रकाशित झाले. या लेखांचे तपशील पुढील प्रमाणे-

**International Jopurnal of Mendel**

President- Dr. M.S. Swaminathan.

Secretary - Dr. R.N. Trivedi

1) " Palynological Study of Maritime Indicator Orchid, Acampe Premorsa Blatter 2McCann from Mumbai 20(4) 2003.

2) " Pollen analysis of some species of genus - Aerides Lour from Maharashtra " - Injt J of Mendel, 2004 Vol. XXI (3) Page No. 39-40.

3) "Studies on Dermal anatomy of of Some Terricolous Orchids from Sahyadri (Western Ghats) 22(I) 2005.

या शिवाय Phytotaxonomy या जर्नलमध्ये पुढीलप्रमाणे निबंध प्रकाशित झाले-

4) "Palnological onservations of some corticolous Orchids from Maharashtra under SEM. M.S. Mulgaonkar & G.T. Dabhade. Phytolaxonomy Vol. 4, 2004 PP. 131-134.

\- संकलित

दिशा
नियमित वाचा

## लेखनासाठी काही विषय

- आंतरराष्ट्रीय पदार्थ विज्ञान वर्ष
- आईन्स्टाईनचा सापेक्षतावाद
- घन कचरा व्यवस्थापन
- मी या प्रकल्पात ''बिझी' आहे, अर्थात प्रकल्प परिचय
- संशोधन, कशात कसे ?
- ग्रंथ संस्कारातील/सहवासातील काही क्षण
- दांडी यात्रा आणि आजचा संदर्भ
- आय. पी. आर्
- तत्त्वज्ञानाचे नवे ज्ञान
- ... आणि मी वाचायला लागलो
- सर्वांसाठी आरोग्य, सर्वांसाठी शिक्षण आणि २०२० साल !
- भारत महासत्ता बनविण्याच्या दृष्टिने


## फार्म - ४

वृत्तपत्र नोंदणी अधिनियम - ८ नुसार माहिती

**मासिकाचे नाव** : व्ही.पी.एम्. दिशा

**प्रसिद्धी काळ** : मासिक

**संपादक** : डॉ. विजय बेडेकर
बेडेकर हॉस्पिटल, ठाणे - ४०० ६०२.

**राष्ट्रीयत्व** : भारतीय

**मुद्रक** : विलास सांगुर्डेकर,
परफेक्ट प्रिंटस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे.

**प्रकाशक** : कार्याध्यक्ष,
विद्या प्रसारक मंडळ,
नौपाडा, ठाणे.